ठाणे, सोमवार दि. १७ जून २०२४ वर्ष : १३, अंक : ५० , पाने : ४, किंमत : २ रुपये Maharashtra Samrat Maharashtra Samrat dainikmahasamrat@gmail.com Reg. No. THC/58/2024-2026

दैनिक
# महाराष्ट्र सम्राट
सम्राट अनेक परंतु बातम्यांचा एकच!®
मुंबई, मुंबई उपनगर, ठाणे, नवी मुंबई, रायगड, पालघर, पुणे
संपादक : चंद्रकांत भोईटे

अग्रलेख
**केंद्र सरकारचे विकासकार्य आणि विरोधक**
महाराष्ट्रात नुकतीच महाविकास आघाडीची बैठक झाली. या बैठकीला शिवसेना ठाकरे गटाचे उद्धव ठाकरे, राष्ट्रवादी पक्षाचे शरद पवार आणि काँग्रेस पक्षाचे ....पान २ वर

निर्धन रुग्णांच्या जीवांचे रक्षण करणारा रुग्णदूत मंगेश चिवटे ...पान ३ वर

ई-पेपरसाठी नियमित पहा...
ePaper PDF
www.maharashtrasamrat.com

**तापमान**
कमाल ३६° से | किमान २९° से

**बाजार**
सोने ७२,५५० | चांदी ९३,५००

**डोकं खाजवा** –अशोक सुतार

विद्यार्थ्यांसाठी खुशखबर !

# शाळा-महाविद्यालयातच मिळणार एसटी बसचा पास

**मुंबई : शाळा– महाविद्यालयात शिक्षण घेणाऱ्या लाखो विद्यार्थी–विद्यार्थिनींना आता एसटीचे पास हे थेट त्यांच्या शाळेत वितरित करण्यात येणार एसटी महामंडळाच्या सूचना देण्यात आल्या आहेत. विशेष म्हणजे तशा सूचना एसटी महामंडळाचे उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक डॉ. माधव कुसेकर यांनी स्थानिक एसटी प्रशासनाला दिल्या आहेत.**

नवीन वर्षाच्या पहिल्या सत्रातील शाळा आता सुरू झालेल्या आहेत. घरापासून शाळेपर्यंत जाण्यासाठी शासनाने विद्यार्थ्यांना एसटीच्या माध्यमातून ६६% इतकी सवलत दिली आहे. म्हणजे केवळ ३३% रक्कम भरून विद्यार्थ्यांना मासिक पास काढता येतो. त्याचप्रमाणे शासनाच्या पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर योजनेअंतर्गत बारावीपर्यंत शिक्षण घेणाऱ्या सर्व विद्यार्थिनींना मोफत एसटी पासचे वितरण केले जाते. यासाठी विद्यार्थी विद्यार्थिनींना एसटीच्या पास केंद्रावर जाऊन रांगेत उभा राहून पास घ्यावे लागत होते. गटागटाने आगारात जाऊन आगार व्यवस्थापनकडून पास घेतले जात असते. पण यंदापासून विद्यार्थ्यांना पाससाठी आता रांगेत ताटकळत उभे राहावे लागणार नाही. त्यांच्या शाळा –महाविद्यालयांनी पुरवलेल्या यादीनुसार एसटीच्या कर्मचाऱ्याकडून त्या विद्यार्थ्यांना आणि विद्यार्थिनींना त्यांचे एसटी पास थेट शाळेत देण्यात येणार आहेत. जेणेकरून त्यांचा वेळ वाया जाणार नाही.



### विद्यार्थ्यांसाठी विशेष मोहीम

या संदर्भात १८ जून पासून एसटी प्रशासनातर्फे एसटी पास थेट तुमच्या शाळेत ही विशेष मोहीम राबविण्यात येत आहे. तत्पूर्वी सर्व शाळा महाविद्यालयाच्या मुख्याध्यापक व प्राचार्य यांना एसटीच्या आगार व्यवस्थापकांनी पत्र देऊन आपल्या शाळेत नवीन वर्षात शिकणाऱ्या विद्यार्थी विद्यार्थ्यांची यादी तयार ठेवण्यास सांगितले आहे. या अभिनव योजनेचा लाभ राज्यभरात शिक्षण घेणाऱ्या लाखो विद्यार्थी- विद्यार्थिनींना होणार आहे.

### १५ जूनपासून 'एक राज्य एक गणवेश'

केंद्र शासनाच्या समग्र शिक्षा कार्यक्रमांतर्गत शासकीय तसेच स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शाळांमधील पहिली ते आठवीमध्ये शिक्षण घेत असलेल्या मुला-मुलींना मोफत गणवेश योजनेचा लाभ देण्यात येतो.

### 'एसटी पास थेट तुमच्या शाळेत' विशेष मोहीम

विद्यार्थ्यांना मोफत एसटी पासचा वितरण केले जात आणि त्यासाठी आता पाच केंद्रावर जाऊन किंवा आगारात जाऊन पास घेण्यासाठी रांगत उभे राहण्याची गरज नाही एसटी बसचे पासेस आता थेट शाळेत दिले जाणार आहेत.


ठाण्यात आ. डावखरे यांच्या प्रचारार्थ विजय संकल्प मेळाव्याचे आयोजन

# सरकार विरोधी एनजीओमध्ये अर्बन नक्षलीची घुसखोरी

मुख्यमंत्री यांच्याकडून विरोधकांची पोलखोल



**ठाणे – फेक नॅरेटीव्ह पसरवण्यात विरोधकांसोबत काही एनजीओ कार्यरत होत्या, त्यामुळे आतापर्यंत गडचिरोलीत असणारे अर्बन नक्षली आता या एनजीओमध्ये घुसले आहेत.तेच सरकार विरोधी काम करीत आहेत. अशी पोलखोल मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केली. तर शिवसेनेचे १९ टक्के मतदान होते त्यापैकी १४.५ टक्के मतदान आमच्याकडे आहे तर साडेपाच टक्के उबाठा कडे म्हणजेच उर्वरीत मतदान कुठले आहे ते सर्वांनाच माहित आहे. मोदी द्वेषाने पछाडलेले आता म्हणतायत गलती हो गयी, असा टोला त्यांनी उद्धव ठाकरेंना थेट लगावला. (पान २ वर)**




### कीर कीर कशाला...डायरेक्ट डावखरे – मुख्यमंत्र्यांचे भाकीत

मागच्या वेळेस संजय मोरे आणि नजीब मुल्ला हे दोन्ही प्रतिस्पर्धी उमेदवार महायुतीत आहेत. त्यामुळे, ८५ टक्के ऐवजी आता १०० टक्के मतदान निरंजन डावखरे यांना मिळेल. असे भाकित करून गेली १२ वर्षे आ.डावखरे यांनी चांगले काम केले आहे. तेव्हा, समोर उमेदवार कोण आहे ? त्याची कीर कीर कशाला...डायरेक्ट डावखरे यांनाच पसंती मिळेल. असेही मुख्यमंत्री शिंदे म्हणाले.

### विधान परिषदेच्या चारही जागा महायुती जिंकणार – फडणवीस

ठाणे – लोकसभा निवडणुकीत महायुतीला तडीपार करण्याची गर्जना करणाऱ्याना जनतेने कोकणातुन तडीपार केले. आता राज्यातील शिक्षक आणि पदवीधर अशा चार मतदार संघाच्या निवडणुक ही महाराष्ट्रात नवीन नॅरेटीव्ह करणारी ठरेल आणि या निवडणुकीत महायुती चारही जागा मोठ्या मताधिक्याने जिंकेल, असा विश्वास उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केला.
ठाणे येथे रविवारी कोकण पदवीधर निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर महायुतीच्या विजय संकल्प मेळाव्यात बोलताना उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी महाविकास आघाडीवर टीका केली. लोकसभा निवडणुकीत ठाणे जिल्हा आणि कोकण विभागात महायुतीला प्रचंड यश मिळाले.
येथील सहा पैकी पाच जागा महायुतीने जिंकल्या.
भिवंडीची जागा मिळू शकली नसून इथे काय घडले हे सर्वांनाच माहीत आहे. मुंब्र्यात जे झाले, तेच भिवंडीत झाले, (पान २ वर)




लोकसभा निवडणुकीत शिवसेनेने संभाजीनगर, कोकण, ठाणे हे बालेकिल्ले राखले

# आता विधानसभेच्या तयारीला लागा


### शिवसेनेच्या वर्धापन दिनाच्या पूर्वतयारीसाठी पक्ष पदाधिकाऱ्यांची बैठक संपन्न



**सदस्य नोंदणी, मतदार याद्या अद्ययावत करणे आणि शिवदूत नेमणुकीला प्राधान्य**

मुंबई :- १९ जून रोजी पार पडणाऱ्या शिवसेनेच्या ५८ व्या वर्धापनदिनाच्या तयारीच्या अनुषंगाने आज पक्षाचे सर्व नेते, मंत्री, आमदार आणि पदाधिकाऱ्यांची संयुक्त बैठक आज मुंबईत पार पडली. (सविस्तर वृत्त पान २ वर)

# कोपरी मिठबंदर रोडवरील श्रमदान सोसायटीचे प्लास्टर पडून तीन जखमी





ठाणे – ठाण्याच्या कोपरी मीठबंदर परिसरातील श्री स्वामी समर्थ मठाजवळ असलेल्या श्रमदान सोसायटीच्या इमारतीच्या दुसऱ्या माळ्यावरील फ्लॅटचे प्लास्टर पडून पिलरला तडे गेल्याची घटना रविवारी पहाटे ६ वाजण्याच्या सुमारास घडली. प्लास्टर पडण्याच्या घटनेत तीन व्यक्तीं किरकोळ जखमी झाले असून त्यांच्यावर रुग्णालयात उपचार करून त्यांना घरी सोडण्यात आले. अशी माहिती ठाणेपालिका आपत्ती व्यवस्थापन विभागाने दिली. कोपरी पूर्व मीठ बंद परिसरातील तीस वर्ष जुनी असलेली इमारत श्रमदान सोसायटी ही तळ अधिक चार मजल्याची इमारत आहे. रविवारी पहाटे सहा वाजण्याच्या सुमारास अचानक दुसऱ्या माळ्यावर राहणाऱ्या निकिता पाटणकर यांच्या रूमचे छताचे प्लास्टर पडल्याची आणि इमारतीच्या पिल्लरला तडे गेल्याची घटना घडली. सदर इमारत ही प्रशासकीय इमारत आहे. इमारतीच्या दुसऱ्या मजल्यावरील रूम नं. १० मधील तीन व्यक्ती जखमी झाल्या. यामध्ये प्रदीप मोहिते. (४६) यांच्या डाव्या पायाला किरकोळ दुखापत झाली. कु. यश मोहिते. (१६) यांच्या उजव्या पायाला दुखापत व मुका मार लागला. तर कु. निधी मोहिते(१२) यांच्या दोन्ही पायाला दुखापत व मुका मार लागला आहे. दोन अल्पवयीन मुले आणि एक पुरुष या तिन्ही व्यक्तींवरती जिल्हा शासकीय रुग्णालय, (पान २ वर)

जिल्हाधिकारी कार्यालय व पारसिक वेल्फेअर फाऊंडेशन यांच्यावतीने

# कळवा येथे मोफत दाखले वाटप शिबीराचे आयोजन

६७२ नागरिकांनी घेतला लाभ



ठाणे – जिल्हाधिकारी कार्यालय, ठाणे आणि पारसिक वेल्फेअर फाऊंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने रविवारी, श्री स्वामी समर्थ मंगल कार्यालय, दत्तवाडी, कळवा येथे आयोजित केलेल्या मोफत दाखले वाटप शिबीरात ६७२ नागरिकांनी विविध दाखल्यांचा लाभ घेतला असल्याची माहिती, राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेश प्रवक्ते, ठाणे व पालघर समन्वयक, ठाणे जिल्हाध्यक्ष आनंद परांजपे व प्रदेश सरचिटणीस, अल्पसंख्याक निरीक्षक नजीब मुल्ला यांनी दिली आहे.
जिल्हाधिकारी कार्यालय, ठाणे आणि पारसिक वेल्फेअर फाऊंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने रविवार, दिनांक १६ जून, २०२४ रोजी, सकाळी १० ते सायंकाळी ५ या वेळेमध्ये श्री स्वामी समर्थ मंगल कार्यालय, दत्तवाडी, कळवा येथे मोफत दाखले वाटप शिबीराचे आयोजन



करण्यात आले होते. यामध्ये १) रहिवासी दाखला, २) अधिवास (डोमेसाईल दाखला), ३) उत्पन्नाचा दाखला आणि ४) ज्येष्ठ नागरिक दाखला असे ६७२ विविध दाखले नोंदविण्यात आले. या मोफत दाखले वाटप (पान २ वर)

# काँग्रेसच्या अंबरनाथ शहर उपाध्यक्षपदी विलास हरिभाऊ जोशी यांची निवड

जिल्हाध्यक्ष दयानंद चोरघे यांच्याहस्ते देण्यात आले नियुक्तीपत्र

अंबरनाथ – अंबरनाथ शहर ब्लॉक काँग्रेस कमिटीच्या शहर उपाध्यक्षपदी माजी नगरसेवक विलास हरिभाऊ जोशी यांची शनिवारी निवड करण्यात आली असून तसे नियुक्ती काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष दयानंद चोरघे यांच्याहस्ते त्यांना देण्यात आले आहे, जोशी यांची शहर उपाध्यक्षपदी निवड झाल्यानंतर त्यांचे सर्वच स्तरातून अभिनंदन करण्यात येत आहे.
काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष दयानंद चोरघे यांनी पत्रकारांशी बोलताना सांगितले की, अंबरनाथ शहरातील पक्ष संघटन अधिक मजबूत करण्यासाठी काँग्रेस पक्षात कार्यरत असणारे माजी नगरसेवक विलास हरिभाऊ जोशी यांची शहर उपाध्यक्षपदी निवड करण्यात आली असून आपण अथक परिश्रम घेऊन ही जबाबदारी यशस्वीरित्या पार पाडाल, असा विश्वासही चोरघे यांनी व्यक्त करत पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.
याप्रसंगी काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष दयानंद चोरघे, उपाध्यक्ष ॲड. यशवंत जोशी, अंबरनाथ शहराध्यक्ष ॲड. कृष्णा रसाळ पाटील यांच्यासह अनेक मान्यवर, पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.









ऐरोली विधानसभा नवी मुंबई, उपशहर अध्यक्ष निलेश बानखेले यांच्यावतीने राज ठाकरे यांच्या वाढदिवासानिमित्त एरोली सेक्टर ३ येथे छत्री वाटप, वह्या वाटप, गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार, आरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी ज्येष्ठ नागरिकांना ५ हजार छत्र्यांचे वाटप करण्यात आले, तर दहावी, बारावीतील १२० गुणवंत विद्यार्थ्यांचा जाहीर सत्कार करण्यात आला. त्याचबरोबर गरीब, गरजू विद्यार्थ्यांना मोफत वह्या वाटप करण्यात आले. तसेच आरोग्य शिबिराचे ही आयोजन करण्यात आले. यावेळी नागरिकांनी या शिबिराला उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. यावेळी एरोलीतील मनसे कार्यकर्त्यांचा विशेष सहभाग लाभला.

# संपादकीय...



संपादक-चंद्रकांत भोईटे

## केंद्र सरकारचे विकासकार्य आणि विरोधक

महाराष्ट्रात नुकतीच महाविकास आघाडीची बैठक झाली. या बैठकीला शिवसेना ठाकरे गटाचे उद्धव ठाकरे, राष्ट्रवादी पक्षाचे शरद पवार आणि काँग्रेस पक्षाचे बाळासाहेब थोरात आणि पृथ्वीराज चव्हाण उपस्थित होते. या बैठकीच्या वेळी नेत्यांनी पत्रकारांच्या प्रश्नांना अनेक उत्तरे दिली. या उत्तरांतून महाराष्ट्राचे राजकारण कसे आहे याची कल्पना आली. राज्यात भाजपाने या लोकसभा निवडणुकीत कमी जागा मिळवल्या. याचे कारण म्हणजे सार्वजनिक संस्थांचा केंद्र सरकारने केलेला गैरवापर होय, असे शरद पवार यांनी म्हटले आहे. तसेच महाविकास आघाडी इंडिया आघाडीला पाठिंबा देत महाराष्ट्रात पुन्हा एकदा नव्या जोमाने एनडीए आघाडीच्या विरोधात लढणार असल्याचे महाविकास आघाडीच्या नेत्यांनी स्पष्ट केले. शरद पवार यांनी म्हटले आहे की, पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या जेवढ्या सभा विधानसभा निवडणुकीवेळी होतील, तेवढा भाजपचा ब्रँड व्हॅल्यू कमी होऊ शकतो. लोकसभा निवडणुकीच्या नुकत्याच लागलेल्या निकालामुळे महाविकास आघाडीचा आत्मविश्वास या बैठकीत दिसून आला आहे. तसेच सर्व विरोधक भाजपा व एनडीएच्या विरोधात निर्भयपणे उभे राहणार असल्याचे महाविकास आघाडीच्या नेत्यांनी स्पष्ट केले आहे. नुकतीच राज्यातील महाविकास आघाडीचे नेत्यांची बैठक पार पडली. यानंतर पत्रकार परिषदेत पत्रकारांना उत्तर देताना महाविकास आघाडीच्या नेत्यांमध्ये ठाम विश्वास दिसून आला. तसेच महाराष्ट्रातील जनतेने लोकसभा निवडणुकीत लोकशाहीची बुज राखली, अशी प्रतिक्रिया शरद पवार यांनी दिली. कारण भाजपाने लोकसभा निवडणुकीच्या प्रचारावेळी धार्मिक ध्रुवीकरण करण्याचा प्रयत्न केला होता. परंतु राज्यातील जनतेने त्यांना जागा दाखवली असेही म्हटले. राज्यात व देशात विरोधकांवर राष्ट्रीय तपास यंत्रणांची कारवाई करायला लावून त्यांच्यावर दबाव आणण्याची प्रक्रिया केंद्र सरकारकडून होत होती. या प्रकाराला जनतेने उत्तर दिले आहे. यातून भाजपा काहीतरी बोध घेईल असे शरद पवार यांनी म्हटले आहे. परंतु भाजपा सरकार असा बोध घेण्याच्या तयारीत नसल्याचेही म्हटले. थोडक्यात, राज्यात भाजपा विरोधात वातावरण आहे, असा संदेश पत्रकार परिषदेत महाविकास आघाडीच्या नेत्यांनी दिला. कारण देशामध्ये केंद्र सरकारने केलेली मनमानी,धार्मिक ध्रुवीकरण तसेच विरोधकांवर दबाव तंत्र या गोष्टी मतदारांना पसंत पडलेल्या नाहीत. याचेच प्रतिबिंब लोकसभा निवडणुकीच्या मतदानात दिसून आले. यामुळे राज्यातील सर्व विरोधक एकत्र येत आहेत असाच संदेश महाविकास आघाडीचे नेत्यांनी दिला आहे.नुकत्याच झालेल्या लोकसभा निवडणुकीत भाजपाला सत्ता स्थापनेसाठी कसरत करावी लागली आहे. कारण २०१९ च्या तुलनेत भाजपाला या लोकसभा निवडणुकीत कमी जागा मिळालेल्या आहेत. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी लोकसभा निवडणुकीत ४०० पारचा आकडा करण्याचा निश्चय केला होता. परंतु लोकसभा निवडणुकीत भाजपाला ३०० संख्येच्या आत जागा मिळाल्या. यामुळे मतदार भाजपवर नाराज आहेत असा संदेश सर्वत्र पसरला आहे. तसेच सत्ता स्थापनेसाठी भाजपाला बिहारचे संयुक्त जनता दलचे नेते नितीश कुमार व दक्षिणेतील चंद्रबाबू नायडू यांनी पाठिंबा दिल्यानंतर केंद्रात भाजपचे सरकार स्थापन झाले आहे. केंद्र सरकार स्थापन करण्यासाठी भाजपा अनेक खटपटी करत होता. यावेळी भाजपाला स्पष्ट बहुमत मिळालेले नाही. त्यामानाने इंडिया आघाडीला विरोधी पक्ष सक्षम राहावा यासाठी अडीचशेपर्यंत जागा मिळालेल्या आहेत. त्यामुळे यावेळी संसदेत विरोधी पक्षांची प्रतिष्ठा शाबूत राहिली आहे. कारण यापूर्वी संसदेत विरोधी पक्षनेता नेमताना अपेक्षित जागा नसल्यामुळे विरोधी पक्षनेता नव्हता. त्यामुळे भाजपाची मनमानी सुरू होती. परंतु आता काँग्रेसचा विरोधी पक्ष नेता संसदेत आहे. त्यामुळे विरोधकांचे म्हणणे केंद्र सरकारला ऐकावे लागेल. विरोधी पक्षनेत्याची भाजपाला दखल घ्यावी लागेल, असे दिसते. यामुळे केंद्र सरकार कुठलाही मनमानी निर्णय घेणार नाही अशी अपेक्षा आहे.

केंद्र सरकारने देशात जुन्या योजना बंद करून त्याच योजना पुन्हा नव्या नावाने केल्या. तसेच राम मंदिर बांधले पण ते अजून पूर्ण बांधलेले नाही. परंतु मतदारांना असे भासवले की, आम्हीच राम मंदिर बांधू शकतो. सर्वोच्च न्यायालय राम मंदिरबाबत निकाल देणारच होते. परंतु त्यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या कार्यकाळात निकाल दिला. त्यामुळे आम्ही राम मंदिर बांधू शकलो, विरोधक कधीच राम मंदिर बांधू शकले नसते, असा संदेश भाजपने सर्वत्र पोहोचवला. तसेच इंडिया आघाडी केंद्रात सत्तेवर आली तर तुमचे सर्व काही मुसलमानांना देतील असेही भाजपाने आपले प्रचारात म्हटले होते. तसेच इंडिया आघाडी सर्वसामान्य लोकांचे मंगळसूत्र काढून घेतील, असाही चुकीचा प्रचार करण्यात आला. त्यामुळे भाजपने देशांमध्ये लोकसभा निवडणुकीवेळी धार्मिक ध्रुवीकरण केले. परंतु मतदारांनी भाजपच्या या खेळीला रोखले आहे. मतदारांनी भाजपच्या पारड्यात स्पष्ट बहुमत दिलेले नाही. तसेच भाजपाच्या इशाऱ्यावरून लोकसभा निवडणुकीवेळी विरोधकांच्या चिन्हाशी साधर्म्य असलेली चिन्हे इतर उमेदवारांना दिली होती. यात निवडणूक आयोगाने महत्त्वाची भूमिका बजावली. त्यामुळे काही ठिकाणी भाजपचे उमेदवार निवडून आले. म्हणजे भाजपाने ही निवडणूक चिन्हांचे डावपेच यशस्वी होण्यासाठी आखले होते आणि निवडणूक आयोगाने याची अंमलबजावणी केल्याचे मतदारांमध्ये चर्चा होती. यामुळे भाजपवर मतदार मोठ्या संख्येत नाराज असल्याचे दिसून आले. त्याचेच प्रतिबिंब लोकसभा निवडणुकीच्या निकालात दिसून आले आहे.

लोकसभा निवडणुकीच्या प्रचारावेळी भाजपाने पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या अनेक सभांचे आयोजन केले होते. परंतु मोदींनी ज्या ठिकाणी सभा घेतल्या, तेथील बहुतांश उमेदवार निवडणुकीत हारलेले आहेत. याचा अर्थ पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची जादू ओसरत चालली आहे. त्यांनी खटपटी करून केंद्र सरकार स्थापन केल्यामुळे त्यांची अब्रू वाचली. कारण पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी देशात विरोधकांवर दबावतंत्र टाकत राजकारण केले. तसेच महागाई, बेरोजगारी आणि गरीबी त्यांच्या काळात जास्त प्रमाणात वाढली. मोदींच्या कार्यकाळात केंद्र सरकारने फक्त जाहिरातबाजी केली परंतु अपेक्षित असा सर्वसामान्य लोकांचा विकास केला नसल्याचे दिसून आले. हे जरी नकारात्मक वाटले तरी सत्य आहे. कारण देशात मोठ-मोठे प्रकल्प आणून विकास केल्याचे भासवले गेले परंतु सर्व सामान्य माणूस नेमका कसा जगतो यावर त्या देशाची प्रतिष्ठा ठरवली जाते. सर्वसामान्य माणूस केंद्रीभूत मानून केंद्र सरकारने विकास करावा ही अपेक्षा आहे.

### लोकसभा निवडणुकीत शिवसेनेने संभाजीनगर, कोकण, ठाणे हे बालेकिल्ले राखले

# आता विधानसभेच्या तयारीला लागा




**▌शिवसेनेच्या वर्धापन दिनाच्या पूर्वतयारीसाठी पक्ष पदाधिकाऱ्यांची बैठक संपन्न**

**▌सदस्य नोंदणी, मतदार याद्या अद्ययावत करणे आणि शिवदूत नेमणुकीला प्राधान्य**

मुंबई :- १९ जून रोजी पार पडणाऱ्या शिवसेनेच्या ५८ व्या वर्धापनदिनाच्या तयारीच्या अनुषंगाने आज पक्षाचे सर्व नेते, मंत्री, आमदार आणि पदाधिकाऱ्यांची संयुक्त बैठक आज मुंबईत पार पडली. यावेळी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी पक्ष पदाधिकाऱ्यांशी संवाद साधताना लोकसभा निवडणुकीचा सविस्तर लेखाजोखा मांडला. या निवडणुकीत आपण संभाजीनगर, कोकण, ठाणे पालघर हे सेनेचे सर्व बालेकिल्ले राखले असून आता पूर्ण ताकतीने विधानसभेच्या तयारीला लागा असे निर्देश दिले. यावेळी बोलताना शिंदे यांनी, नुकत्याच झालेल्या लोकसभा निवडणुकीत पक्षाला मिळालेल्या यशाबद्दल सर्व सहकाऱ्यांचे अभिनंदन केले. मात्र या निवडणुकीत झालेल्या चूका सुधारून आगामी विधानसभा निवडणुकीत अधिक सक्षमपणे तयारीला लागण्याच्या सूचना दिल्या. १९जून या वर्धापनदिनापासून पक्षाची सदस्य नोंदणी पुन्हा सुरू करणे, आपापल्या विभागात मतदारांची नोंदणी करून मतदारयाद्या दुरुस्त करणे, तसेच विभागवार शिवदूतांच्या नेमणुका करणे याला प्राधान्य देण्यास सांगितले.

या लोकसभा निवडणुकीत आपला स्ट्राईक रेट हा उबाठा सेनेपेक्षा उत्तम होता.त्यांनी २२ जागा लढवून ९ जिंकल्या तर आपण १५ जागा लढवून ७ जिंकल्या आहेत. त्यामुळे त्यांचा स्ट्राईक रेट हा ४२ टक्के तर आपला ४८ टक्के एवढा आहे. दुसरीकडे मुंबईत त्यांच्यापेक्षा २ लाख जास्त मते आपल्याला मिळालेली आहेत. बाळासाहेबांचे छत्रपती संभाजीनगर आपण राखले असून कोकणातही जनतेने महायुतीलाच साथ दिलेली आहे. त्यामुळे जनता आपल्याला साथ देत आहे, असे असले तरीही महायुतीबद्दल या निवडणुकीत निर्माण झालेले चुकीचे चित्र आगामी विधानसभा निवडणुकीत पालटून टाकण्यासाठी आपल्याला अधिक जोमाने काम करावे लागेल असेही स्पष्ट सांगितले.

लोकसभा निवडणुकीत विरोधकांनी 'संविधान बदलणार' असे खोटे नेरेटिव्ह तय[illegible] दिशाभूल करण्याचा प्रयत्न करण[illegible] हे चित्र फार काळ टिकणार नाही. कारण केंद्रातील मोदी सरकार आणि राज्यातील आपले सरकार हे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांवर चालणारे सरकार आहे. त्यामुळे आशा चुकीच्या नेरेटिव्हची आगामी विधानसभा निवडणुकीत पुनरावृत्ती होऊ द्यायची नाही असा निर्धार व्यक्त करून कामाला लागण्याच्या सूचना शिंदे यांनी केली. तसेच पंढरपूरच्या आषाढी वारीसहित,दहीहंडी, गणपती,दसरा,दिवाळी असे सर्व हिंदूंचे सर्वच सण मोठ्या उत्साहात साजरे करावेत असेही सांगितले. वारीला निघणाऱ्या पालख्यांचे पक्षाच्या वतीने जागोजागी स्वागत करावे तसेच त्यांची सोय करावी असेही आदेश दिले. तसेच गावागावात वाडी वस्तीवर शिवसेनेचे बोर्ड लागावेत, शाखा सुरू कराव्यात असेही सांगितले.

शिवसेना राबवणार वृक्षरोपणाची मोहीमयंदाच्या उन्हाळ्यात राज्यातील तापमान प्रचंड वाढले होते. [illegible] जिल्ह्यात शासनाकडून वृक्षारोपण मोहीम राबवली जाणार आहे. प्रत्येक जिल्ह्यात १ लाख वृक्ष लावण्याचे आदेश मुख्यमंत्र्यांनी जिल्हाधिकाऱ्यांना दिलेत मात्र त्यासोबत अशीच मोहीम पक्षाच्या वतीने राबवण्याचा निर्णय शिवसेनेने घेतला आहे. यासाठी प्रत्येक शिवसैनिकाने पुढाकार घेऊन कामाला लागावे असे निर्देश मुख्यमंत्री शिंदे यांनी आजच्या बैठकीत दिले. या मोहिमेअंतर्गत पक्षाच्या वतीने रोपे देण्यात येणार असून पक्षाच्या पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांच्या माध्यमातून प्रत्येक जिल्ह्यात ही वृक्षारोपण मोहीम राबविण्यात येणार आहे. वाढते प्रदूषण आणि तापमानवाढ आटोक्यात आणण्यासाठी सामजिक बांधिलकी म्हणून प्रत्येक शिवसैनिकाने या मोहिमेत सहभागी व्हावे असे आवाहन मुख्यमंत्री शिंदे यांनी या बैठकीत केले.

## विधान परिषदेच्या चारही जागा महायुती जिंकणार – फडणवीस

(पान १ वरून) असे ते म्हणाले. लोकसभा निवडणुकीमध्ये आपण तीन पक्षांसोबत एका खोट्या कथनकाशी लढत होतो. संविधान बदलणार, आरक्षण जाणार अशा खोट्या कथनकामुळे निवडणुकीत आपली पीछेहाट झाली. असे असले तरी महाविकास आघाडी आणि महायुतीला मिळालेली मते जवळपास सारखीच आहे. लोकसभा निवडणुकीत महाविकास आघाडीने तयार केलेले खोटे कथानक कसे दूर करता येतील आणि खरे कथानक जनतेपर्यंत पोहचविण्यास सुरुवात केली आहे. त्यामुळे राज्यातील शिक्षक आणि पदवीधर अशा चार मतदार संघाच्या निवडणुका महत्वाच्या असून या निवडणुका राज्यात खरे कथानक ठरवणारी ठरेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. मनसे प्रमुख राज ठाकरे यांच्याशी चर्चा केल्यानंतर त्यांनी अभिजीत पानसे यांची उमेदवारी मागे घेतली, त्याबद्दल त्यांचे आभार मानतो, असेही ते म्हणाले. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वामध्ये राज्य सरकारने अनेक महत्त्वाचे निर्णय घेतलेले आहेत. शिक्षक, पदवीधर यांचे अनेक प्रश्न सोडविण्याचे काम सरकारने केले. विशेषतः २००५ पासून शिक्षकांचे प्रश्न होते, ते दूर करण्याचे काम सरकारने केले. त्यामुळे राज्यातील चारही जागा मोठ्या मताधिक्याने निवडून येतील, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला.

दरम्यान, २६ जून रोजी जोरदार पाऊस पडणार पण मतांचाही पाऊस पडुन आ. डावखरे तिसऱ्यांदा मतांचा उच्चांक करतील असा विश्वास आ.गणेश नाईक यांनी व्यक्त केला.

## कोपरी मिठबंदर रोडवरील श्रमदान सोसायटीचे प्लास्टर पडून तीन जखमी

(पान १ वरून) ठाणे या ठिकाणी प्राथमिक उपचार करून सोडण्यात आले आहे. श्रमदान सोसायटीच्या इमारतीमध्ये एकूण २० सदनिका आहेत. त्यातील १० ते १२ सदनिकांमध्ये प्लास्टरला व कॉलमला तडे गेले आहेत, सद्यस्थितीत रूम नं. १० मधील राहणाऱ्या तीन रहिवाश्यांना बाहेर काढण्यात आले. त्यांना तात्पुरत्या स्वरुपात दुसऱ्या ठिकाणी ठिकाणी स्थलांतर करण्यात आले आहे.

घटनास्थळी उपायुक्त शंकर पाटोळे, नौपाडा-कोपरी प्रभाग समिती सहाय्यक आयुक्त आपत्ती व्यवस्थापन अधिकारी, बांधकाम विभागाचे अभियंता, उप अभियंता, अग्निशमन दलाचे जवान वाहनासह तसेच आपत्ती व्यवस्थापन कक्षाचे कर्मचारी, अतिक्रमण विभागाचे कर्मचारी व कोपरी पोलीस स्थानकाचे पोलीस अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. श्रमदान सोसायटी इमारत क्रमांक-०३ मध्ये एकूण अंदाजे ६० ते ६५ व्यक्ती राहत होत्या. इमारतीवर ठा.म.पा. बांधकाम विभाग व अतिक्रमण विभाग यांच्याकडून पुढील कार्यवाही करण्याचे काम सुरू आहे.

## कळवा येथे मोफत दाखले वाटप शिबिराचे आयोजन

(पान १ वरून) शिबीराचा नागरिकांनी मोठ्याप्रमाणात लाभ घेतला, अशी माहिती प्रदेश प्रवक्ते आनंद परांजपे व प्रदेश सरचिटणीस नजीब मुल्ला यांनी केली आहे. यावेळी माजी नगरसेवक प्रकाश बर्डे, उमेश पाटील, विजया लासे, मंगला कळंबे, राजेंद्र साप्ते, राष्ट्रवादी काँग्रेस ठाणे जिल्हा सरचिटणीस प्रभाकर सावंत, रविंद्र पालव, प्रदेश युवक उपाध्यक्ष आदित्य धुमाळ, विद्यार्थी अध्यक्ष कौस्तुभ गायकवाड, परिवहन सदस्य नितिन पाटील, मोहसीन शेख, युवक कार्याध्यक्ष संदेश पाटील, अल्पसंख्याक सेलचे अध्यक्ष हुसेन मणियार, सामाजिक न्याय विभाग अध्यक्ष मंगेश सूर्यवंशी, कार्याध्यक्ष कुणाल साबळे, वैद्यकीय आरोग्य कक्ष कार्याध्यक्ष रोहन जाधव, कार्यकारिणी सदस्य दीपक पाटील, दिनेश बने, सुनिल पाटील, पल्लवी गिध, मयूर आरोटे, युवक पदाधिकारी रोहित रायकर, शहबाज चेऊलकर, संदीप शिंदे, नासीर शेख आदी पदाधिकारी उपस्थित होते.

## सरकार विरोधी एनजीओमध्ये अर्बन नक्षलीची घूसखोरी

(पान १ वरून) कोकण पदवीधर मतदारसंघात महायुतीमधुन भाजपचे विद्यमान आमदार निरंजन डावखरे निवडणुक लढवत आहेत.आ. डावखरे यांच्या प्रचारार्थ रविवारी ठाण्यात आयोजित करण्यात आलेल्या विजय संकल्प मेळाव्यात मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले. यावेळी आ. डावखरे यांच्या व्हीजन डॉक्युमेंटचे प्रकाशन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याहस्ते करण्यात आले.याप्रसंगी, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, ठाण्याचे नवनिर्वाचित खा.नरेश म्हस्के,डॉ. हेमंत सवरा, माजी केंद्रीय मंत्री कपील पाटील,ना. रविंद्र चव्हाण,आ.गणेश नाईक,आ.गीता जैन, प्रताप सरनाईक,मनिषा कायंदे ,रमेश पाटील, मंदाताई म्हात्रे,उमा खापरे,माजी खा.राजेंद्र गावित, आ.रविंद्र फाटक, राष्ट्रवादीचे प्रमोद हिंदुराव, आनंद परांजपे, मनसे नेते अविनाश जाधव, अभिजीत पानसे, रिपाईचे (आठवले) भास्कर वाघमारे, माधवी नाईक, भाजपा ठाणे शहर जिल्हाध्यक्ष संजय वाघुले आदीसह भाजप, शिवसेना, राष्ट्रवादी, मनसे आणि रिपाईचे पदाधिकारी-कार्यकर्ते उपस्थित होते.

मुख्यमंत्री शिंद यांनी आपल्या भाषणात लोकसभा निवडणुकीत गाफीलपणा भोवल्याचे कबुल करीत विरोधकांच्या फेक नॅरेटीव्हमुळे हे घडल्याचे सांगितले. तरीही भिवंडीचा अपवाद वगळता कोकण आता महायुतीचा बालेकिल्ला बनला आहे. विरोधकासोबत काही एनजीओनी खोटे नॅरेटीव्ह पसरवण्याचे काम केले. केवळ गडचिरोली पर्यंत मर्यादित असणारा नक्षलवाद आता अर्बन नक्षली च्या रूपात या एनजीओच्या माध्यमातून शहरी भागात पसरला आहे. असे मुख्यमंत्री शिंदे म्हणाले.मोदी द्वेषाने पछाडलेले हे लोक मोदी हटाव म्हणून घोषणा देत होते.पण मोदी हटले नाही आणि ते पुन्हा सत्तेत आले. मात्र चांगले काम करूनही खोटे नॅरेटिव्ह पसरविण्यात काँग्रेस यशस्वी ठरली.तरीही लोकसभा निवडणुकीत महायुती आणि महाविकास आघाडी मधील मतांच्या टक्केवारीत जास्त फरक नसल्याचे मुख्यमंत्र्यांनी नमुद केले.

**निरंजन डावखरेना वाढता पाठींबा...-** कोकण पदवीधरचे विद्यमान आ. निरंजन डावखर यांना विविध संघटना आणि संस्थांचा वाढता पाठीबा मिळत आहे. कोकण रेल्वे प्रवाशी सेवा संघाचे राजु कांबळे, महाराष्ट्र इंग्लिश स्कुल ट्रस्टीज असोसिएशन (मेस्टा) चे नरेश पवार,महाराष्ट्र राज्य शिव छत्रपती शिक्षक संघटना आ. ज्ञानेश्वर म्हात्रे, ठाणे जिल्हा मुख्याध्यापक संघ, ठाणे जिल्हा कला अध्यापक संघ आणि कोचिंग क्लासेस संघटनेच्या अमोल जगताप यांनी आपली उमेदवारी मागे घेऊन डावखरे यांना पाठींबा जाहिर केला.

# कल्याण शीळ रस्त्यावरील वाहतूक कोंडीवर उपाययोजना करण्यासाठी महापालिका आयुक्त डॉ. इंदु राणी जाखड़ यांचे दालनात बैठकीचे आयोजन!

सद्यस्थितीत कल्याण डोंबिवली मधील कल्याण शीळ रस्त्यावर कल्याण- तळोजा( मेट्रो -१२) या प्रकल्पाच्या कामास सुरुवात झालेली आहे. कल्याण शीळ रस्ता हा महापालिका क्षेत्रातील मुख्य हमरस्ता आहे व याच मार्गाने सर्वात जास्त अवजड वाहनांची वाहतूक होते. मेट्रो प्रकल्पाच्या कामामुळे शीळ रस्त्यावर लोखंडी बॅरिकेट्स टाकून कामात सुरुवात करण्यात आली आहे, यामुळे अनेक ठिकाणी रस्ता अरुंद झाला असून मोठ्या प्रमाणावर वाहतूक समस्या निर्माण झाली आहे.




या कामात समन्वय साधण्यासाठी व किमान जागेत प्रकल्पाचे काम सुरू ठेवून वाहतूक समस्या सोडविणे कामे मेट्रो प्रकल्पाची अंमलबजावणी करणारे MMRDA, MSRDC, वाहतूक पोलीस व कल्याण डोंबिवली महानगरपालिका यांचे वरिष्ठ अधिकारी /अभियंते यांची संयुक्त बैठक महापालिका आयुक्त डॉ. इंदु राणी जाखड़ यांच्या अध्यक्षतेखाली महापालिका मुख्यालयात काल आयोजित करण्यात आली होती.

या बैठकीत मेट्रोच्या कामासाठी आवश्यक कल्याण शीळ रस्त्याची जागा व त्या अनुषंगाने उद्भवणाऱ्या वाहतूक समस्यांचा आढावा या बैठकीत घेण्यात आला . सद्यस्थितीत कल्याण शीळ रस्त्याच्या ज्या भागात मेट्रो कामाव्यतिरिक्त दोन्ही बाजूस वाहतुकीच्या दोन लेन्स सुरू आहेत, तेथे काम सुरू करण्याचे निर्देश देण्यात आले तसेच MSRDC यांना कल्याण शीळ रस्त्याच्या ज्या भागात रुंदीकरण अपूर्ण आहे तेथे त्वरित भूसंपादन करून रस्त्याची रुंदी पूर्ण करण्याचे निर्देश देण्यात आले त्याचप्रमाणे बहुतांश ठिकाणी रस्त्याच्या तिसऱ्या लेनचे काम अपूर्ण असून तेथे खडीकरण पूर्ण करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

मेट्रो प्राधिकरणाचे अधिकारी यांनी वाहतूक व्यवस्था राखणे कामी ट्रॅफिक वॉर्डन/ सूचनाफलक / सुरक्षा विषयी साधने वाहतूक पोलीस शाखा यांच्या सूचनेनुसार पुरविण्याचे सदर बैठकीत मान्य केले आहे. शीळ रस्त्यावरील अवजड वाहनांची वाहतूक बदलापूर पाईप रस्ता- मलंग रोड- चक्की नाका मार्गाने वळविण्याच्या पर्यायावर देखील सहमती झाली असून त्याबाबत लवकरच नियोजन करण्यात येईल तसेच मानपाडा रोड मार्गाने लहान वाहनांची ट्रॅफिक वळविणे बाबत देखील या बैठकीत नियोजन करण्यात आले. मेट्रो प्राधिकरणाचे अधिकारी यांना मानपाडा स्टेशन व हेदुटने दरम्यान ,मेट्रो साठी डीपी रोडचा विकास करणे करिता त्या भागाचे नियोजन प्राधिकरण असलेल्या MMRDA विभागाशी समन्वय साधणे विषयी सूचित करण्यात आले आहे. MSRDC अधिकारी यांनी संपूर्ण शीळ रस्ता MMRDA कडे हस्तांतरित करण्याचा प्रस्ताव विचाराधीन असल्याचे सदर बैठकीत सांगितले.

Public Trusts Registration Office, Thane
Address: 1st Floor,Lilly Apt, Parsi Agari Lane
Tembi Naka Thane (w)- 400601

**Public Notice**

Service Request Number : THN/00951/18/24
Inquiry/case No. : ACC/3/185/2024
Name of the Trust : **ओम सत्यानंदस्वरूपिणी जनकल्याण ट्रस्ट**
**Address of the Trust : ए/२६, सिध्दीविनायक बिल्डींग, गणेश नगर, चर्चजवळ, नांदिव, कल्याण, डोंबिवली, ठाणे, ठाणे, ठाणे**
**Name of the Applicant : श्री. प्रदीप शिवशंकर दुबे**

To
**All Concerned having interest**
Whereas in the above application under section 19 of the Maharashtra Public Trust Act 1950, an enquiry is to be made under section 19 of the said Act, on the following points by the Asst. Charity Commissioner, Thane.

1. Whether a Trust in the respect of the above exists and whether such Trust is a public Trust?
2. Whether any of the following properties are the properties of such Trust?

**Movable Property**

| SR | Property Details | Estimated Value |
|---|---|---|
| 1 | Cash In Hand | 1000.00 |

**Value of Movable Property :** Rs. 1000/- Only
(In Words Rs. One Thousand Only)

**Immovable Property**

| SR NO | Town Or Village | CS Or Municipal Or Survey No | Area | Assessment Or Judiciary | Tenure Or Nature | Estimated Value |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | Nil | Nil | Nil | Nil | Nil | 0.00 |

Value of Immovable Property : Rs. 0/- Only
(In Words Rs. Only)

This is to call upon you to submit your objections or any evidences if any, at the above office address within 30 days from the date of publication of this notice in written. If not received anything within given period, the inquiry would be completed & necessary orders will be passed. If no objections are received within the stipulated time then further inquiry would be completed and necessary orders will be passed.

This notice given under my hand and seal of the Office on this date 12/06/2024.

Stamp

Sign/-
Superintendent
Public Trusts registration Office,
Thane

Public Trusts Registration Office, Thane
Address: 1st Floor,Lilly Apt, Parsi Agari Lane
Tembi Naka Thane (w)- 400601

**Public Notice**

Service Request Number : THN/01558/18/24
Inquiry/case No. : ACC/I/294/2024
Name of the Trust : **श्री स्वामी समर्थ सेवा ट्रस्ट**
**Address of the Trust : ई-विंग, फ्लॅट नं. १०४, चिंतामणी वस्ती, माय होम, कॅमेलिया, सावरोली रोड, ता. शहापूर, ठाणे, ठाणे, ठाणे**
**Name of the Applicant : श्री. गोपाळ अरुण दीक्षित.**

To
**All Concerned having interest**
Whereas in the above application under section 19 of the Maharashtra Public Trust Act 1950, an enquiry is to be made under section 19 of the said Act, on the following points by the Asst. Charity Commissioner, Thane.

1. Whether a Trust in the respect of the above exists and whether such Trust is a public Trust?
2. Whether any of the following properties are the properties of such Trust?

**Movable Property**

| SR | Property Details | Estimated Value |
|---|---|---|
| 1 | Cash In Hand | 1000.00 |

**Value of Movable Property :** Rs. 1000/- Only
(In Words Rs. One Thousand Only)

**Immovable Property**

| SR NO | Town Or Village | CS Or Municipal Or Survey No | Area | Assessment Or Judiciary | Tenure Or Nature | Estimated Value |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | Nil | Nil | Nil | Nil | Nil | 0.00 |

Value of Immovable Property : Rs. 0/- Only
(In Words Rs. Only)

This is to call upon you to submit your objections or any evidences if any, at the above office address within 30 days from the date of publication of this notice in written. If not received anything within given period, the inquiry would be completed & necessary orders will be passed. If no objections are received within the stipulated time then further inquiry would be completed and necessary orders will be passed.

This notice given under my hand and seal of the Office on this date 10/06/2024.

Stamp

Sign/-
Superintendent
Public Trusts registration Office,
Thane

Public Trusts Registration Office, Thane
Address: 1st Floor,Lilly Apt, Parsi Agari Lane
Tembi Naka Thane (w)- 400601

**Public Notice**

Service Request Number : THN/01788/18/24
Inquiry/case No. : ACC/I/264/2024
Name of the Trust : **मॅड्डी मेकर चॅरिटेबल ट्रस्ट**
**Address of the Trust : फ्लॅट नं. बी-२०, प्लॉट नं. ४८०, सुदर्शनी सोसायटी, सेक्टर २, ऐरोली, नवी मुंबई, ठाणे, ठाणे, ठाणे**
**Name of the Applicant : श्री. मिलिंद सखाराम तांबे**

To
**All Concerned having interest**
Whereas in the above application under section 19 of the Maharashtra Public Trust Act 1950, an enquiry is to be made under section 19 of the said Act, on the following points by the Asst. Charity Commissioner, Thane.

1. Whether a Trust in the respect of the above exists and whether such Trust is a public Trust?
2. Whether any of the following properties are the properties of such Trust?

**Movable Property**

| SR | Property Details | Estimated Value |
|---|---|---|
| 1 | Cash In Hand | 1000.00 |

**Value of Movable Property :** Rs. 1000/- Only
(In Words Rs. One Thousand Only)

**Immovable Property**

| SR NO | Town Or Village | CS Or Municipal Or Survey No | Area | Assessment Or Judiciary | Tenure Or Nature | Estimated Value |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | Nil | Nil | Nil | Nil | Nil | 0.00 |

Value of Immovable Property : Rs. 0/- Only
(In Words Rs. Only)

This is to call upon you to submit your objections or any evidences if any, at the above office address within 30 days from the date of publication of this notice in written. If not received anything within given period, the inquiry would be completed & necessary orders will be passed. If no objections are received within the stipulated time then further inquiry would be completed and necessary orders will be passed.

This notice given under my hand and seal of the Office on this date 10/06/2024.

Stamp

Sign/-
Superintendent
Public Trusts registration Office,
Thane

## हिंदुस्तान पेट्रोलियम

■ पद
१ मेकॅनिकल इंजिनिअर
२ इलेक्ट्रिकल इंजिनिअर
३ इन्स्ट्रुमेंटेशन इंजिनिअर
४ सिव्हिल इंजिनिअर
५ केमिकल इंजिनिअर
६ सिनियर ऑफिसर (CGD)
७ सिनियर ऑफिसर (CGD) Projects
८ सिनियर ऑफिसर/असिस्टंट मॅनेजर (Non-Fuel Business)
९ सिनियर मॅनेजर (Non-Fuel Business)
१० मॅनेजर (Technical)
११ मॅनेजर (Sales-RD Product Commercialisation)
१२ डेप्युटी जनरल मॅनेजर (Catalyst Business Development)
१३ चार्टर्ड अकाउंटेंट (CA)
१४ क्वालिटी कंट्रोल (QC) ऑफिसर
१५ IS ऑफिसर
१६ IS सिक्योरिटी ऑफिसर- Cyber Security Specialist
१७ क्वालिटी कंट्रोल (QC) ऑफिसर

■ शैक्षणिक पात्रता: UR/OBC/EWS: ६०% गुण, SC/ST/PWD:५०% गुण
पद क्र.१: मेकॅनिकल इंजिनिअरिंग पदवी.
पद क्र.२: इलेक्ट्रिकल इंजिनिअरिंग पदवी.
पद क्र.३: इन्स्ट्रुमेंटेशन इंजिनिअरिंग पदवी
पद क्र.४: सिव्हिल इंजिनिअरिंग पदवी.
पद क्र.५: केमिकल इंजिनिअरिंग पदवी.
पद क्र.६: (i) इंजिनिअरिंग पदवी (Mechanical/ Electrical/ Instrumentation/ Civil) (ii) ०३ वर्षे अनुभव
पद क्र.७: (i) इंजिनिअरिंग पदवी (Mechanical/ Electrical/ Instrumentation/ Civil) (ii) ०३ वर्षे अनुभव
पद क्र.८: (i) MBA/PGDM² (ii) इंजिनिअरिंग पदवी (Mechanical/ Electrical/ Instrumentation/ Chemical/ Civil) (iii) ०२/०५ वर्षे अनुभव
पद क्र.९: (i) MBA/PGDM² (ii) इंजिनिअरिंग पदवी (Mechanical/ Electrical/ Instrumentation/ Chemical/ Civil) (iii) ११ वर्षे अनुभव
पद क्र.१०: (i) इंजिनिअरिंग पदवी (Chemical/ Polymer /Plastics Engineering) (ii) ०९ वर्षे अनुभव
पद क्र.११: (i) केमिकल इंजिनिअरिंग पदवी (ii) ०९ वर्षे अनुभव
पद क्र.१२: (i) केमिकल इंजिनिअरिंग पदवी (ii) १८ वर्षे अनुभव
पद क्र.१३: CA
पद क्र.१४: (i) M.Sc. (Chemistry (-nalytical/ Physical / Organic/Inorganic) (ii) ०३ वर्षे अनुभव
पद क्र.१५: (i) B.Tech. (Computer Science/ IT Engineering) / MCA किंवा डाटा सायन्स पदव्युत्तर पदवी (ii) ०२ वर्षे अनुभव
पद क्र.१६: (i) इंजिनिअरिंग पदवी (Computer Science/ Information Technology/ Electronics Communications Engineering/ Information Security)/ MCA (ii) १२ वर्षे अनुभव
पद क्र.१७: (i) M.Sc. (Chemistry-Analytical / Physical / Organic/ Inorganic) (ii) ०३ वर्षे अनुभव

■ वयाची अट: ३० जून २०२४ रोजी, SC/ST: ०५ वर्षे सूट, OBC: ०३ वर्षे सूट
पद क्र.१ ते ५: २५ वर्षांपर्यंत
पद क्र.६ ७: २८ वर्षांपर्यंत
पद क्र.८: २९/३२ वर्षांपर्यंत
पद क्र.९: ३८ वर्षांपर्यंत
पद क्र.१०: ३४ वर्षांपर्यंत
पद क्र.११: ३६ वर्षांपर्यंत
पद क्र.१२: ४५ वर्षांपर्यंत
पद क्र.१३: २७ वर्षांपर्यंत
पद क्र.१४ १७: ३० वर्षांपर्यंत
पद क्र.१५: २९ वर्षांपर्यंत
पद क्र.१६: ४५ वर्षांपर्यंत

■ वय गणकयंत्र: वय मोजा
■ Fee: General/OBC-NC/EWS: ११८०/- SC/ST/PWD: फी नाही
■ अर्ज करण्याची शेवटची तारीख: ३० जून २०२४
■ वेबसाईट: https://www.hindustanpetroleum.com/

## महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनी लि.

■ पदाचे नाव : विद्युत सहाय्यक
शैक्षणिक पात्रता: (i) १०+२ बंधातील माध्यमिक शालांत परीक्षा (१०वी) (ii) ITI (विजतंत्री/तारतंत्री (Electrician / Wireman) किंवा महाराष्ट्र राज्य व्यवसाय परीक्षा मंडळ यांनी प्रमाणित केलेले ०२ वर्षांचा पदविका (Electrician / Wireman) अभ्यासक्रम प्रमाणपत्र.
■ वयाची अट: २९ डिसेंबर २०२३ रोजी १८ ते २७ वर्षे मागासवर्गीय/आ.दु.घ.: ०५ वर्षे सूट
■ वय गणकयंत्र: वय मोजा
■ नोकरी ठिकाण: संपूर्ण महाराष्ट्र
■ फी : खुला प्रवर्ग: २५०/- मागासवर्गीय/आ.दु.घ./अनाथ: १२५/-
■ अर्ज करण्याची शेवटची तारीख: २० जून २०२४
■ अधिकृत वेबसाईट: https://www.mahadiscom.in/

## न्यूक्लियर पावर कॉर्पोरेशन ऑफ इंडिया लि.

पदाचे नाव :
१ असिस्टंट ग्रेड-१ (HR)
२ असिस्टंट ग्रेड-१ (FA)
३ असिस्टंट ग्रेड-१ (CMM²)
■ शैक्षणिक पात्रता (पद क्र.१ ते ३): ५०% गुणांसह कोणत्याही शाखेतील पदवी.
■ वयाची अट: २५ जून २०२४ रोजी २१ ते २८ वर्षे SC/ST: ०५ वर्षे सूट, OBC: ०३ वर्षे सूट
■ वय गणकयंत्र: वय मोजा
■ नोकरी ठिकाण: संपूर्ण भारत
■ Fee: General/OBC/EWS: १००/- SC/ST/PwBD/DODPKI-/महिला: फी नाही
■ अर्ज करण्याची शेवटची तारीख: २५ जून २०२४
■ अधिकृत वेबसाईट: https://www.npcil.nic.in/Content/Hindi/index.aspx

## सीमा सुरक्षा दल

### सीमा सुरक्षा दल

■ combatised/group_B/2024 1 इंस्पेक्टर (Librarian)
■ combatised/group_B_C/2024 2 सब इंस्पेक्टर (Staff Nurse)
■ असिस्टंट सब इंस्पेक्टर (Lab Tech)
■ असिस्टंट सब इंस्पेक्टर (Physiotherapist)
■ SMT_WKSP/२०२४ सब इंस्पेक्टर (Vehicle Mechanic)
■ कॉन्स्टेबल (OTRP)
■ कॉन्स्टेबल (SKT)
■ कॉन्स्टेबल (Fitter)
■ कॉन्स्टेबल (Carpenter)
■ कॉन्स्टेबल (Auto Elect)
■ कॉन्स्टेबल (Veh Mech)
■ कॉन्स्टेबल (BSTS)
■ कॉन्स्टेबल (Upholster)
Veterinary_Staff/2024 हेड कॉन्स्टेबल (Veterinary)
■ हेड कॉन्स्टेबल (Kennelman)
■ शैक्षणिक पात्रता:
पद क्र.१: ग्रंथालय विज्ञान किंवा ग्रंथालय आणि माहिती विज्ञान या विषयात पदवी.
पद क्र.२: (१) १२वी उत्तीर्ण (२) जनरल नर्सिंग डिप्लोमा/पदवी
पद क्र.३: (१) १२वी (सायन्स) उत्तीर्ण (२) डीएमएलटी
पद क्र.४: (१) १२वी (सायन्स) उत्तीर्ण (२) फिजियोथेरपिस्ट डिप्लोमा/पदवी (३) ०६ महिने अनुभव
पद क्र.५: ऑटोमोबाईल/ मेकॅनिकल डिप्लोमा/पदवी
पद क्र.६ ते १३: (१) १०वी उत्तीर्ण (२) संबंधित ट्रेड मध्ये
पद क्र.१४: (१) १२वी उत्तीर्ण (२) व्हेटर्नरी स्टॉक असिस्टंट कोर्स (३) ०१ वर्ष अनुभव
पद क्र.१५: (१) १०वी उत्तीर्ण (२) शासकीय पशुवैद्यकीय रुग्णालय किंवा दवाखाना किंवा पशुवैद्यकीय महाविद्यालय किंवा शासकीय पशु फार्म येथून जनावरे हाताळण्याचा दोन वर्षांचा अनुभव.
■ वयाची अट: १७ जून २०२४ रोजी, /: ०५ वर्षे सूट, : ०३ वर्षे सूट
पद क्र.१ ५: ३० वर्षांपर्यंत
पद क्र.२: २१ ते ३० वर्षे
पद क्र.३: १८ ते २५ वर्षे
पद क्र.४: २० ते २७ वर्षे
पद क्र.६ ते १५: १८ ते २५ वर्षे
■ वय गणकयंत्र: वय मोजा
■ नोकरी ठिकाण: संपूर्ण भारत
■ फी /: फी नाही
पद क्र.1,2, 5, 14 & 15: General/OBC/EWS: ₹200/-
पद क्र..3,4, 6 ते13: General/OBC/EWS: ₹100/-
■ अर्ज करण्याची शेवटची तारीख: १७ जून २०२४
■ अधिकृत वेबसाईट: https://www.bsf.gov.in/




## इंदिरा गांधी अणुसंशोधन केंद्र

■ पदाचे नाव :
१ सायंटिफिक ऑफिसर/E
२ सायंटिफिक ऑफिसर/D
३ सायंटिफिक ऑफिसर/C
४ टेक्निकल ऑफिसर
५ सायंटिफिक असिस्टंट/C
६ नर्स/-
७ सायंटिफिक असिस्टंट/B
८ फार्मासिस्ट
९ टेक्निशियन
■ शैक्षणिक पात्रता:
पद क्र.१: (i) M.B.B.S. (ii) M.S./ M.D. (iii) ०४ वर्षे अनुभव
पद क्र.२: (i) MBBS (ii) M.D.S./ B.D.S./M.D./M.S. (iii) ०३/०५ वर्षे अनुभव
पद क्र.३: (i) M.B.B.S. (ii) ०१ वर्ष अनुभव
पद क्र.४: ५०% गुणांसह फिजिओथेरपी P.G.पदवी
पद क्र.५: ५०% गुणांसह MSW
पद क्र.६: B.Sc.(Nursing) किंवा १२वी उत्तीर्ण + -NM²
पद क्र.७: ६०% गुणांसह B.Sc. (Medical Lab Technology) किंवा ६०% गुणांसह PG DMLT किंवा B.Sc. (Radiography) किंवा ५०% गुणांसह B.Sc. + रेडिओग्राफी डिप्लोमा किंवा ६०% गुणांसह B.Sc. (Nuclear Medicine Technology) + ५०% गुणांसह B.Sc. + DMRIT/ DNMT/DFIT
पद क्र.८: (i) १२वी उत्तीर्ण (ii) फार्मसी डिप्लोमा
पद क्र.९: (i) ६०% गुणांसह १२वी उत्तीर्ण (Science). (ii) Plaster / Orthopaedic Technician/ ECG Technician/ Cardio Sonography / Echo Technician प्रमाणपत्र
■ वयाची अट: ३० जून २०२४ रोजी, SC/ST: ०५ वर्षे सूट, OBC: ०३ वर्षे सूट
पद क्र.१: १८ ते ५० वर्षे
पद क्र.२: १८ ते ४० वर्षे
पद क्र.३ ते ७: १८ ते ३५ वर्षे
पद क्र.८ ९: १८ ते २५ वर्षे
■ वय गणकयंत्र: वय मोजा
■ नोकरी ठिकाण: कल्पाक्कम (तमिळनाडु)
■ फी : SC/ST/महिला: फी नाही
पद क्र.१ ते ३: ३००/-
पद क्र.४ ते ६: २००/-
पद क्र.८ ९: १००/-
■ अर्ज करण्याची शेवटची तारीख: ३० जून २०२४
■ अधिकृत वेबसाईट: https://www.igcar.gov.in/

## आयबीपीएस भरती

■ जागा : ९९९५ जागा
■ पदाचे नाव:
१ ऑफिस असिस्टंट (Multipurpose)
२ ऑफिसर स्केल-I
३ ऑफिसर स्केल-II (General Banking Officer)
४ ऑफिसर स्केल-II (IT)
५ ऑफिसर स्केल-II (C-)
६ ऑफिसर स्केल-II (Law)
७ ऑफिसर स्केल-II (Treasury Manager)
८ ऑफिसर स्केल-II (Marketing Officer)
९ ऑफिसर स्केल-II (-griculture Officer)
१० ऑफिसर स्केल-III
■ शैक्षणिक पात्रता:
पद क्र.१: कोणत्याही शाखेतील पदवी.
पद क्र.२: कोणत्याही शाखेतील पदवी.
पद क्र.३: (i) ५०% गुणांसह कोणत्याही शाखेतील पदवी. (ii) ०२ वर्षे अनुभव
पद क्र.४: (i) ५०% गुणांसह पदवी (Electronics/ Communication/Computer Science/ Information Technology) (ii) ०१ वर्ष अनुभव
पद क्र.५: (i) CA (ii) ०१ वर्ष अनुभव
पद क्र.६: (i) ५०% गुणांसह विधी पदवी (LLB) (ii) ०२ वर्षे अनुभव
पद क्र.७: (i) CA/MBA (Finance) (ii) ०१ वर्ष अनुभव
पद क्र.८: (i) MBA (Marketing) (ii) ०१ वर्ष अनुभव
पद क्र.९: (i) ५०% गुणांसह पदवी (Agriculture/ Horticulture/ Dairy/ Animal Husbandry/ Forestry/ Veterinary Science/ Agricultural Engineering/ Pisciculture) (ii) ०२ वर्षे अनुभव
पद क्र.१०: (i) ५०% गुणांसह कोणत्याही शाखेतील पदवी. (ii) ०५ वर्षे अनुभव
वयाची अट: ०१ जून २०२४ रोजी, SC/ST: ०५ वर्षे सूट, OBC: ०३ वर्षे सूट
पद क्र.१: १८ ते २८ वर्षे
पद क्र.२: १८ ते ३० वर्षे
पद क्र.३ ते ९: २१ ते ३२ वर्षे
पद क्र.१०: २१ ते ४० वर्षे
■ नोकरी ठिकाण: संपूर्ण भारत
■ फी :
पद क्र.१: General/OBC: ८५०/- SC/ST/PWD/ExSM²: १७५/-
पद क्र.२ ते १०: General/OBC: ८५०/- SC/ST/PWD: १७५/-
■ अर्ज करण्याची शेवटची तारीख: २७ जून २०२४
■ परीक्षा:
पूर्व परीक्षा: ऑगस्ट २०२४
एकल/मुख्य परीक्षा: सप्टेंबर/ऑक्टोबर २०२४
■ अर्ज
पद क्र.१: https://ibpsonline.ibps.in/rrb13oamay24/
पद क्र.२ ते १०: https://ibpsonline.ibps.in/rrbxiiimay24/

## न्यूक्लियर पावर कॉर्पोरेशन ऑफ इंडिया लि.

पदाचे नाव :
१ असिस्टंट ग्रेड-१ (HR)
२ असिस्टंट ग्रेड-१ (FA)
३ असिस्टंट ग्रेड-१ (CMM²)
■ शैक्षणिक पात्रता (पद क्र.१ ते ३): ५०% गुणांसह कोणत्याही शाखेतील पदवी.
■ वयाची अट: २५ जून २०२४ रोजी २१ ते २८ वर्षे SC/ST: ०५ वर्षे सूट, OBC: ०३ वर्षे सूट
■ वय गणकयंत्र: वय मोजा
■ नोकरी ठिकाण: संपूर्ण भारत
■ Fee: General/OBC/EWS: १००/- SC/ST/PwBD/DODPKI-/महिला: फी नाही
■ अर्ज करण्याची शेवटची तारीख: २५ जून २०२४
■ अधिकृत वेबसाईट: https://www.npcil.nic.in/Content/Hindi/index.aspx

# निर्धन रुग्णांच्या जीवांचे रक्षण करणारा रुग्णदूत

**मित्रहो,समाजातील गोरगरीब, निर्धन व निराधार व्यक्ती जी हातापोटावर जीवन जगून आपल्या कुटुंबाचा कसाबसा उदरनिर्वाह करत असते.दुर्दैवाने जर अशा व्यक्तीला एखादा मोठा आजार जडल्याने शस्त्रक्रिया करण्याची गरज भासली,तर तो हॉस्पिटलचा खर्च कसा उचलेल? 'अठरा विश्वे दारिद्र्य ' असल्याने आपल्या दुर्धर आजारपणामुळे त्या व्यक्तीस पैश्याअभावी अखेर प्राण गमवावाच लागेल. त्याला पर्याय नाही.इतकेच नव्हे तर,दारिद्र्यामुळे अशा असंख्य रुग्णांना दैनंदिन जीवनात आपले प्राण गमवावे लागलेत.या पार्श्वभूमीवर कोणीही रुग्णसेवेपासून वंचित राहू नये. तसेच पैश्याअभावी कोणा गरीबाचे प्राण जाऊ नयेत, या उद्देशाने राज्याचे पूर्वाश्रमीचे नगर विकास मंत्री एकनाथजी शिंदे यांनी हिंदूहृदयसम्राट वंदनीय बाळासाहेब ठाकरे यांच्या भगव्या प्रेरणेतून १७ नोव्हेंबर २०१७ रोजी ठाणे-कोपरी येथील आपल्या जनसंपर्क कार्यालयात शिवसेना वैद्यकीय मदत कक्षाची स्थापना केली, अन् त्याद्वारे जणू रुग्णसेवेचा एकप्रकारे शुभारंभच झाला. दरम्यान, राज्याचे माजी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या कार्यकाळात सामाजिक कार्याची आवड असणाऱ्या मंगेश चिवटे यांच्या संकल्पनेतून साकारलेल्या मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता निधी कक्षाच्या धर्तीवर शिवसेना वैद्यकीय मदत कक्षाची स्थापना करण्याचा प्रस्ताव मंगेश चिवटे यांनी ना. एकनाथजी शिंदे यांच्या समोर मांडला.सदर प्रस्तावातील संकल्पना शिंदे यांना मनस्वी आवडल्याने त्यांनी त्यास तात्काळ मंजुरी दिली. मंगेश चिवटे यांच्या संकल्पनेतून साकारलेल्या शिवसेना वैद्यकीय मदत कक्षाच्या माध्यमातून राज्यातल्या गोरगरीब, गरजू व आर्थिकदृश्या दुर्बल घटकांसाठी जणू आरोग्य सेवेची कवाडंच उघडली. इतकेच नव्हे तर, पुढच्या काळात १७ नोव्हेंबर,२०१८ रोजी दादर येथील शिवसेना भवनमध्येही शिवसेना वैद्यकीय मदत कक्षाची उभारणी करण्यात आली. याचं श्रेय मंगेश चिवटे यांनी तनमनधनाने केलेल्या रुग्णसेवेला जातं. पूर्वाश्रमीचे नगर विकास मंत्री तथा आत्ताचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची प्रेरणा अन् कल्याणचे खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांचे बहुमोल मार्गदर्शन लाभल्याने मंगेश चिवटे यांच्या रुग्णसेवेला अधिक चालना मिळून, निराधार रुग्णांना त्यांचे महागडे ऑपरेशन्स करणं सुकर झालं आहे. वास्तवात हीच खरी मंगेश चिवटे यांच्या नि:स्पृह सेवेची फलश्रुती होय.**

रुग्णदूत मंगेश चिवटे यांना वाढदिवसानिमित्त शुभेच्छा व आशिर्वाद देताना,त्यांचा अल्प परिचय करून देणं क्रमप्राप्तच ठरते.मंगेश चिवटे यांचा जन्म १५ जून,१९८८ रोजी स्वातंत्र्य सेनानी साथी मनोहरपंत चिवटे (आजोबा) यांच्या देशप्रेमी घराण्यात झाला. अन् जणू राज्यातील गोरगरीब, निराश्रित लोकांच्या आरोग्याची कणव असलेला रुग्णदुतच उदयास आला.चिवटेसरांचे वडील नरसिंह चिवटे हे स्वातंत्र्यपूर्व काळातील ज्येष्ठ पत्रकार म्हणून जनमानसाला परिचित आहेत,तर आईचे नाव मंदाकिनी चिवटे. मंगेश चिवटे यांच्या सुविज्ञ पत्नीचे नाव .शिल्पा चिवटे आणि एक पुत्र व पुत्री असा त्यांचा परिवार आहे. चिवटे यांच्या पत्नी शिल्पा चिवटे यांची भक्कम साथ मंगेशसरांना लाभत असल्याने त्यांना सातत्याने सामाजिक कार्यात यश प्राप्त होताहे.म्हणूनच म्हणतात ना, हर कामियाब इंसान के पीछे औरत का हाथ होता हैं.

मंगेश चिवटे यांची शालेय जीवनापासूनच एक हुशार विद्यार्थी म्हणून करमाळा येथील महात्मा गांधी विद्यालयात ओळख असायची. त्यांचे महाविद्यालयीन शिक्षण पुण्याच्या एस.पी.कॉलेज मध्ये झाले.त्यांनी मराठी विषयात एम.ए. करून नंतर बी.एड.केलं. याशिवाय चिवटे यांनी पत्रकारिता विषयात देखील पदवी संपादन केली .इतकेच नव्हे तर,मुंबईच्या के. सी. कॉलेजमध्ये लॉ फॅकल्टीची दोन वर्षे पूर्ण करून आत्ता ते शेवटच्या वर्षाला अपियर आहेत.छंद म्हणून ते गड-किल्ल्यांचा प्रवास करत या विषयात संशोधन करत आहेत.आतापर्यंत चिवटेसरांनी ५० गड किल्ल्यांना भेटी दिल्या असून, पन्हाळगड ते पावनखिंड हा प्रवास ते गेल्या १० वर्षांपासून सातत्याने करत आहेत, याचा आम्हाला अभिमान आहे. खरं तर, चिवटेसर हे गाढे शिवभक्त असून,शिवकालीन इतिहासाचे सच्चे अभ्यासक आहेत.सुरुवातीच्या काळात चिवटे यांनी स्टार माझा, जय महाराष्ट्र वृत्तवाहिनी, साम टी व्ही, आय बी एन लोकमत या वाहिन्यांमध्ये विविध पदांवर काम केले. सुमारे २०० हून अधिक नेत्यांच्या मुलाखती घेतल्या. २६/११ रोजीच्या मुंबईवर झालेला दहशतवादी हल्ल्याच्या थरारक प्रसंगाचे त्यांनी कव्हरेज केलं.वास्तवात हेच खरं त्यांच्या साहसीवृत्तीचं द्योतक होय.

शिवसेना वैद्यकीय मदत कक्षाची महती व त्याद्वारे केलेलं रुग्णसेवेचं लोण राज्यासह बेळगाव ,केरळपर्यंत पोहोचणं हे चिवटेसर अन् त्यांच्या टीमच्या कठोर परिश्रमाचे फलित आहे.त्यांच्या सक्षम नेतृत्वाखाली शिवसेना वैद्यकीय मदत कक्षाच्यावतीने राज्यातील प्रत्येक जिल्ह्यात आरोग्य महाशिबिरे आयोजित करून लाखो गरजू लोकांना मोफत औषधोपचार करण्यात आला.तसेच नेत्रचिकित्सा शिबिरे भरवून सर्वधर्मीय गरजू लोकांना मोफत चष्मांचे वाटप करून त्यांना नवदृष्टी प्रदान केली. आज राज्यात सुमारे ५००० रुग्णसेवक तनमनधनाने रुग्णसेवा करून गोरगरिबांच्या जीवांचे रक्षण करत आहेत.महत्वाचे म्हणजे कोरोना काळात हे मदत कक्षाचे कार्यालय लोकांच्या मदतीसाठी २४ तास सुरू ठेवण्यात आले होते.त्यामुळे कोरोनाग्रस्त रुग्णांना वेळीच रुग्णवाहिका,रेमडीसिव्हर इंजेक्शन अन् हॉस्पिटलात बेड मिळण्यास मदत झाल्याने हजारों रुग्णांचे प्राण वाचले. अशा प्रकारे रुग्णसेवा हीच खरी ईश्वरसेवा हे ब्रीद चिवटेसर अन् त्यांच्या टीमने सार्थक करून दाखविले.याबद्दल मुख्यमंत्री एकनाथजी शिंदे अन् खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांनी चिवटेसर व त्यांच्या जांबाज टीमचे तोंडभरून कौतुक केलं.

रुग्णदुत मंगेश चिवटे यांची रुग्णसेवेतील नेत्रदीपक कामगिरी पाहून मुख्यमंत्री एकनाथजी शिंदे यांनी चिवटे यांना मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता निधी कक्षाचे प्रमुख अन् विशेष कार्यकारी अधिकारी अशी दोन महत्वपूर्ण पदांवर नियुक्ती केली. म्हणून शिवसेना वैद्यकीय मदत कक्षाचा कार्यभार रामहरी राऊत व ज्ञानेश्वर धुळगंडे यांच्याकडे सोपविण्यात आला.मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता निधी कक्षाचे प्रमुख या नात्याने चिवटे सरांनी गेल्या १ वर्ष ११ महिन्यात ३२००० हून अधिक रुग्णांचे ख्यातनाम हॉस्पिटल्समध्ये महागडे ऑपरेशन्स मोफत करून देत त्यांना नवजीवन प्रदान केले. या रुग्णांसाठी मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता कक्षातून सुमारे २६७ कोटी,५१ लाख रुपयांचे अर्थसहाय्य उपलब्ध करून देण्यात आले. याशिवाय डॉ. श्रीकांत शिंदे फाउंडेशनतर्फे सुमारे ५००० लहान बालकांच्या हृदयावरील छिद्राचे ऑपरेशन ख्यातनाम ज्युपिटर हॉस्पिटलमध्ये मोफत करून देण्यात आले. आज ही मुलं मोकळा श्वास घेत सुदृढ जीवन जगत आहेत. उल्लेखनीय गोष्ट म्हणजे डॉ. श्रीकांत शिंदे फाउंडेशनतर्फे कोरोना काळात हॉस्पिटल्समध्ये रुग्णांच्या ने-आणसाठी प्रत्येक जिल्हा व तालुक्याच्या ठिकाणी अद्यावत सुविधांयुक्त रुग्णवाहिकांचे लोकार्पण करण्यात आले.ह्या सर्व गोष्टींचे नियोजन चिवटेसरांकडे असल्याने, रुग्णसेवेच्या प्रगतीचा आलेख दिवसंदिवस मोठ्या गतीने वाढतच चालला असल्याने याचं कौतुक करावं तितकं कमीच आहे.आता तर ,चिवटे सरांच्या मार्गदर्शनाखाली अन् राज्याचे कक्ष प्रमुख रामहरी राऊत यांच्या नेतृत्वाखाली राज्यात आरोग्य संवाद यात्रा काढण्यात आली आहे.त्यामुळे राज्यामधील प्रत्येक जिल्ह्यातील नागरिकांशी अन् स्थानिक नेत्यांशी आरोग्यविषयक संवाद साधून पुढील रणनीती आखता येऊ शकेल.



## गोर गरीब रुग्णांचा आपला हक्काचा मंगेश चिवटे

केवळ रुग्णसेवेतच चिवटे सरांनी आघाडी मिळविलेली नाही, तर गडकिल्ल्यांचे भ्रमण करणं अन् त्याचा सखोल अभ्यास करणं हा देखील त्यांचा आवडीचा विषय आहे.त्याचाच एक भाग म्हणून डॉ.श्रीकांत शिंदे फाउंडेशन आणि चिवटे बंधूंचे मुक्ताई गारमेंट, करमाळा यांच्या संयुक्त विद्यमाने गेल्या चार वर्षांपासून किल्ले रायगडवरील शिवछत्रपतींच्या मूर्तींना अखंड पुष्पहार अर्पण सेवा सुरू केली आहे.या नाविन्यपूर्ण व अभूतपूर्व उपक्रमाची कोल्हापूरच्या छत्रपती संभाजी महाराजांनी मुक्तकंठाने प्रशंसा केली. वास्तविक पहाता, शिव छत्रपतींच्या ऐतिहासिक वास्तूंचे नित्यनेमाने पूजन करून त्यांना पुष्पहार अर्पण करणे,हे सर्वाधिक मोठं पुण्यकर्म असून,ते खासदार डॉ.श्रीकांत शिंदे आणि मंगेश चिवटेसर यांच्या हातून होताहे,याचा आम्हा शिवप्रेमींना सार्थ अभिमान आहे.

अशा अनेक सामाजिक चळवळीत नेत्रदीपक कार्य केल्याबद्दल रुग्णदुत मंगेश चिवटेसर यांचा राज्यातील अनेक सेवाभावी संस्था, संघटनांनी पुरस्कार-सन्मानपत्र देऊन गौरव केला.अत: कर्तव्यदक्ष, प्रामाणिक, निष्ठावान, उच्च विद्याविभूषित, धाडसी, कठोर परिश्रम व चिकाटीने सामाजिक कार्यात झोकून घेणारे, गोरगरिबांची कणव असणारे अन् स्वतःच्या तब्येतीची पर्वा न करता आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांच्या जीवांचे रक्षण करणारे रुग्णदुत आदरणीय मंगेश चिवटेसर यांचे वाढदिवसानिमित्त राज्यातील समस्त रुग्णसेवक,डॉक्टर्स, वैद्यकीय सहाय्यक यांच्यातर्फे अभिनंदन अन् भगव्या शुभेच्छा. आपणास सुदृढ, निरोगी व आरोग्यदायी जीवन मिळून गोरगरीब लोकांच्या आरोग्यसेवेसाठी मोठं बळ मिळो, अशी आई जगदंबे चरणी प्रार्थना!

**-रणवीर राजपूत, ठाणे**
मो.न.९९२०६७४२१९

जिल्हाप्रमुख राजाभाई केणी यांच्या वाढदिवसानिमित्त

# रक्तदान शिबिर व विकासकामांचे उद्घाटन





पेण : विभागात विरोधाचा बालेकिल्ला होता पण आता तो ढासळायच काम येथील ग्रामस्थ जनतेने केले आहे.लोकसभेच्या निवडणुकीत पण येथील जनतेने चांगले मताधिक्य खासदार सुनील तटकरे यांना दिला आहे आता विधानसभा आणि जिल्हापरिषदेत ही आपला विजय होईल आणि राजाभाई जिल्हा जिल्हापरिषदेत चांगले सभापतीपद मिळेल असे प्रतिपादन आमदार महेंद्रशेठे दळवी यांनी केले.

शिवसेना जिल्हाप्रमुख राजाभाई केणी यांच्या वाढदिवसानिर्मित आज शनिवारी १५ जून रोजी कुर्डूस जिल्हापरिषद मतदार संघातील हेमनगर येथे भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.

याप्रसंगी आमदार महेंद्रशेठ दळवी यांच्या आमदार निधीतून बांधण्यात आलेल्या पिटकिरी येथे व्यापारी संकुल तसेच तलावाचे सुशोभीकरण,काचळी येथे कै.जनार्दन नागू पाटील सामाजिक सभागृह तसेच व्यायाम शाळा व अंगणवाडी इमारतीच्या कामाचे उद्घाटन आमदार महेंद्रशेठ दळवी यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी आमदार महेंद्रशेठ दळवी, विजयभाऊ कवळे, जिल्हाप्रमुख राजाभाई केणी, रसिका केणी, रेश्मा जोशी, दिपक रानवडे, तालुका प्रमुख अनंत गोंधळी, हिराचंद पाटील, महेश वावेकर, हर्षल पितळे, हृदयनाथ पाटील, प्रमोद पाटील, जीवन पाटील आदी मान्यवर ग्रामस्थ यावेळी उपस्थित होते.

# ठाणे खाडीत दोन जणांनी घेतली उडी

## पुरुषाचा मृतदेह सापडला तर महिलेचा शोध सुरू



**ठाणे : मुंबई- नाशिक महामार्गावरील साकेत पुलावरून ठाणे खाडीत दोन जणांनी उडी मारली आहे. यातील पुरुषाचा मृतदेह रविवारी पोलिसांना आढळून आला आहे. तर महिलेचा शोध लागू शकला नाही. याप्रकरणाची नोंद कळवा पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.**

बबलू विश्वकर्मा (३५) असे मृत व्यक्तीचे नाव असून ते पत्नी आणि तीन मुलांसह वागळे इस्टेट भागात राहत होते. शनिवारी सायंकाळी ७ वाजता साकेत पुलावरून दोनजणांनी खाडीत उड्या मारल्याची माहिती कळवा पोलिसांना प्राप्त झाली होती. त्या माहितीनुसार, पोलिसांचे पथक, ठाणे महापालिकेचे अग्निशमन दल आणि आपत्ती व्यवस्थापन कक्षाकडून खाडीत शोधकार्य सुरू होते. रात्री अंधार असल्याने शोध कार्य थांबविण्यात आले. रविवारी सकाळी पथकांनी पुन्हा शोधकार्य सुरू केले. त्यावेळी बबलू विश्वकर्मा याचा मृतदेह पथकांना आढळून आला. तर चार तासांच्या शोध कार्यानंतरही महिलेचा शोध लागू शकला नव्हता. त्यामुळे शोधकार्य तात्पुरत्या स्वरुपात थांबविण्यात आले आहे. याप्रकरणाची नोंद कळवा पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

# फादर्स डे निमित्ताने बेलापूर पारसिक हिल परिसरात स्वच्छता मोहीमेसह वृक्षारोपण



नवी मुंबई : नुकत्याच झालेल्या जागतिक पर्यावरण दिनाचे औचित्य साधून आज फादर्स डे निमित्त निसर्गाविषयी आपली आपुलकीची भावना व्यक्त करण्यासाठी बेलापूर येथील पारसिक हिल परिसरात नवी मुंबई महानगरपालिका बेलापूर विभाग कार्यालय आणि नेरूळच्या एस. के. कॉलेज चे एनएसएस विद्यार्थी यांच्या संयुक्त विद्यमाने पर्यावरणशील उपक्रम राबविण्यात आला.

यावेळी उपस्थित नमुंमपा अधिकारी – कर्मचारी, स्वच्छतामित्र तसेच एनएसएसचे विद्यार्थी आणि स्वच्छताप्रेमी नागरिकांनी पारसिक हिल परिसरात पडलेला प्लास्टिक, कागद आदी कचरा गोळा करून पारसिक हिल परिसराची स्वच्छता केली तसेच या ठिकाणी फळे – फुले देणाऱ्या नवी मुंबईच्या जैवविविधता वाढीसाठी पोषक झाडांचे वृक्षारोपण करून माझी वसुंधरा अभियानाची सामुहिक शपथही ग्रहण करण्यात आली.

नमुंमपा आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली सर्वच विभागांमध्ये पर्यावरणशील व स्वच्छतापूरक उपक्रमांचे आयोजन करण्यात येत आहे. या उपक्रमांत लोकसहभाग असावा याकडे विशेष लक्ष देण्यात येत असून यामध्ये सुट्टीच्या दिवशी नागरिकांचा मोठ्या प्रमाणावर उत्साही सहभाग लाभत आहे. त्या अनुषंगाने आजही पारसिक हिल परिसरात अतिरिक्त आयुक्त सुनील पवार यांच्या मार्गदर्शनानुसार, घनकचरा व्यवस्थापन विभागाचे उपायुक्त डॉ. अजय गडदे यांच्या नियंत्रणाखाली, बेलापूर विभागाचे सहाय्यक आयुक्त तथा विभाग अधिकारी शशिकांत तांडेल आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी विद्यार्थी व नागरिकांच्या सहभागातून स्वच्छतेचा उपक्रम राबवला.

# शाळेचा पहिला दिवस म्हणजे विद्यार्थ्यांसाठी आनंदाची पर्वणी : उपसरपंच प्रताप पाटील



**ठाणे : शाळेचा पहिला दिवस म्हणजे सर्व विद्यार्थ्यांचा आनंदाचा दिवस असतो. सुट्टीनंतर विद्यार्थी, शिक्षक शाळा सुरू होण्याची वाट पाहत असतात. राहनाळ शाळेने सातत्याने विविध उपक्रमाच्या माध्यमातून शाळेचे नाव महाराष्ट्रभर केल्याचा सार्थ अभिमान राहनाळ ग्रामस्थांना आहे. मुलांनी आपल्या आवडीचे क्षेत्र निवडून नाव कमवावे, असे उद्गार उपसरपंच प्रताप पाटील यांनी प्रवेशोत्सव कार्यक्रमात काढले.**

१५ जून पासून शैक्षणिक सत्र सुरू झाले असून राहनाळ शाळेत या सत्राची अत्यंत उत्साहाने सुरुवात करण्यात आली. पहिलीत दाखल होणाऱ्या विद्यार्थ्यांची रसिका पाटील व संध्या जगताप यांच्या मार्गदर्शनाखाली ढोल ताशा लेझीमच्या गजरामध्ये गावातून मिरवणूक काढण्यात आली. मिरवणूक शाळेजवळ येताच मुलांवर पुष्पवृष्टी करण्यात आली.

सावित्रीमाईंच्या प्रतिमेला प्रताप पाटील यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करण्यात आला. सर्व विद्यार्थ्यांना मोफत पाठ्यपुस्तके, बूट व पायमोजे यांचे वाटप करण्यात आले. इयत्ता पहिलीच्या विद्यार्थ्यांना पेन, चॉकलेट व पुस्तक, बूट देऊन स्वागत करण्यात आले. यावेळी प्रताप पाटील यांनी आपल्या जडणघडणीत शिक्षकांचे मोलाचे स्थान असून मी त्यांच्याशी कृतज्ञ असल्याचे सांगितले.

शाळेचे मुख्याध्यापक अजय पाटील यांनी शासनाच्या विविध योजना, त्याचबरोबर प्रवेशोत्सवा मागील शासनाची भूमिका समजावून सांगितली.

यावेळी पालकवर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होता. शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष प्रमिला कडू, उपाध्यक्ष मनाली जाधव, सदस्य विलास रामिष्टे उपस्थित होते. इयत्ता सातवीमध्ये शिकणारा दिव्यांग विद्यार्थी समद मस्कर यालाही पाठ्यपुस्तके देऊन स्वागत करण्यात आले. सूत्रसंचलन चित्रा पाटील तर आभार प्रदर्शन अंकुश ठाकरे यांनी केले.

# जिल्ह्यात प्रवेशोत्सव निमित्त विद्यार्थ्यांचे स्वागत

ठाणे : जिल्हा परिषद ठाणे, शिक्षण विभाग प्राथमिक मार्फत जिल्ह्यातील सर्व शाळा आज (दि. १५ जून २०२४ ) सुरू झाले असून शाळेतील सर्व विद्यार्थ्यांचे शाळेत स्वागत करण्यासाठी जिल्हा व तालुका स्तरावरील सर्व अधिकारी यांनी शाळा भेट दिली आहे.

भिवंडी तालुक्यातील प्राथमिक शाळा वैजोळा, केंद्र शिवनगर येथे शिक्षणाधिकारी बाळासाहेब राक्षे यांनी भेट देऊन शाळा प्रवेशोत्सव साजरा केला. शिक्षणाधिकारी यांच्या हस्ते विद्यार्थ्यांना गुलाबाचे फुल, गोड पदार्थ, पाठ्यपुस्तक देऊन स्वागत करण्यात आले.



शाळेतील पहिल्या दिवशी जसे सर्वांनी हजेरी लावली तसेच तुम्ही सर्व विद्यार्थ्यांनी वर्षभर शाळेत उपस्थित रहावे असे मार्गदर्शन विद्यार्थ्यांना शिक्षणाधिकारी प्राथमिक बाळासाहेब राक्षे यांनी केले.

आज प्रवेशोत्सव निमित्ताने शासकीय शाळेत गावातील ग्रामस्थ आणि पालक मोठ्या संख्येने उपस्थित आहात ही खरी आनंदाची बाब आहे. विद्यार्थ्यांनी दररोज शाळेत यावे यासाठी पालकांनी विशेष सहकार्य करावे. पालकांनी देखील विद्यार्थ्यांच्या अभ्यासावर लक्ष द्यावे. आहार आणि आरोग्य उत्तम राहिल्यास शिक्षणाची गोडी विद्यार्थ्यांना लागेल. जंक फूड न खाता विद्यार्थ्यांनी उत्तम आहार घ्यावा. शाळा छोटी असून देखील शाळेतील शिक्षक यमुना मिटकरी, अर्चना पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली एकूण ६० विद्यार्थी या शाळेत शिक्षण घेत आहेत. आज शाळा सुरू होत असून शाळेतील नवीन प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यीं, पालक, शिक्षकांचे मनापासून अभिनंदन करतो असे प्रतिपादन शिक्षणाधिकारी यांनी केले.

प्रवेशोत्सव साजरा करण्यासाठी शाळा भेट देऊन मार्गदर्शन केल्याबद्दल अर्चना पाटील यांनी उपस्थित सर्वांचे आभार मानले. यावेळी गटशिक्षणाधिकारी पंचायत समिती भिवंडी संजय असवले, जिल्हा समन्वयक समग्र शिक्षा अनिल कुऱ्हाडे, शाळेचे शिक्षक यमुना मिटकरी, अर्चना पाटील, पालक, ग्रामस्थ आणि शाळेतील विद्यार्थी उपस्थित होते.

## छताचे प्लास्टर कोसळून तीनजण जखमी

ठाणे : कोपरी येथील मीठबंदर भागात सदनिकेतील छताचे प्लास्टर कोसळून तीन जण जखमी झाल्याची घटना रविवारी सकाळी उघडकीस आली. प्रदीप मोहीते (४६), यश मोहीते (१६) आणि निधी मोहीते (१२) अशी जखमींची नावे आहे. त्यांच्यावर जिल्हा शासकीय रुग्णालयात प्राथमिक उपचार करून त्यांना सोडून देण्यात आले आहे.

मीठबंदर येथे सुमारे ३५ वर्ष जुनी श्रमदान ही चार मजली शासकीय इमारत आहे. या इमारतीमध्ये एकूण २० सदनिका असून १० ते १२ सदनिकांमध्ये खांबांना तडे गेले आहे. तसेच प्लास्टरही निखळले आहे. त्यामुळे ही इमारत राहण्यासाठी धोकादायक झाली आहे.

# नवी मुंबई पालिका शाळांमध्ये विद्यार्थ्यांचे प्रवेशोत्सवाप्रसंगी स्वागत

नवी मुंबई : उन्हाळी सुट्टीनंतरचे नमुंमपा कार्यक्षेत्रातील शाळांचे नवीन शैक्षणिक वर्ष आजपासून उत्साहात सुरू झाले असून शाळेच्या पहिल्या दिवशी ठिकठिकाणी विद्यार्थ्यांइतकेच पालकही उत्साही दिसत होते. नवी मुंबई महानगरपालिका क्षेत्रात ४३४ शाळा असून त्यामध्ये नवी मुंबई पालिकेच्या ५७ प्राथमिक तसेच २३ माध्यमिक शाळा आहेत. महापालिका क्षेत्रातील काही सीबीएससी व इंग्रजी माध्यमाच्या शाळा त्यांच्या वेळापत्रकानुसार याआधीच सुरू झालेल्या आहेत.

आज शाळेच्या पहिल्या दिवशी सर्व शाळांमध्ये पालिका आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांच्या मार्गदर्शनानुसार, शिक्षण विभागाचे उपआयुक्त योगेश कडुसकर यांच्या नियंत्रणाखाली अत्यंत उत्साही वातावरणात प्रवेशोत्सव साजरा करण्यात आला.





महानगरपालिकेच्या सर्व शाळांमध्ये नवीन प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांचे औक्षण करून पारंपारिक पध्दतीने स्वागत करण्यात आले. यावेळी मोठ्या विद्यार्थ्यांनी शाळेकडील ढोल – ताशे व लेझीम साहित्याचा उपयोग करून नवीन विद्यार्थ्यांचे वाजत गाजत स्वागत केले. फुलांच्या पाकळ्या उधळून नृत्य करत नवीन प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांना त्यांच्या वर्गापर्यंत नेण्यात आले. याप्रसंगी वेगवेगळ्या ठिकाणी शिक्षण विभागाचे उपआयुक्त योगेश कडुसकर, शिक्षणाधिकारी श्रीम.अरूणा यादव, शिक्षण विस्तार अधिकारी श्रीम. सुलभा बारघारे व केंद्र समन्वयक तसेच शाळांचे मुख्याध्यापक, शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष व सदस्य, पालक, शिक्षणप्रेमी व सामाजिक क्षेत्रात काम करणाऱ्या प्रतिष्ठित व्यक्तींनी विद्यार्थ्यांचे स्वागत केले. यावेळी विद्यार्थ्यांना गुलाबाचे फूल, चॉकलेट व गोड खाऊ देण्यात आला. नमुंमपा शाळेमधील इयत्ता पहिली ते आठवीच्या उपस्थित सर्व विद्यार्थ्यांना पाठ्यपुस्तकाचे वाटप करण्यात आले. काही शाळांमध्ये प्रवेशोत्सवाचे औचित्य साधून नुकत्याच झालेल्या जागतिक पर्यावरण दिनाच्या पार्श्वभूमीवर वृक्षारोपणही करण्यात आले.

ठाणे जिल्हा पशुसंवर्धन विभाग

## बकरी ईद सणासाठी सज्ज

ठाणे : बकरी ईद सण आनंदाने साजरा करण्यात यावा यासाठी ठाणे जिल्हा प्रशासन सज्ज झाले असून ठाणे जिल्ह्यात मुब्रा, भिवंडी, ठाणे, खोणी या ठिकाणी बकरी ईद निमित्ताने कुर्बानी देण्यात येते. त्यासाठी महानगरपालिका व जिल्हा परिषद मार्फत तात्पुरत्या कत्तलखान्याला परवानगी देण्यात आली आहे. प्रादेशिक सह आयुक्त मुबई विभाग डॉ. प्रशांत कांबळे यांनी मार्गदर्शन व सूचना दिल्याप्रमाणे जिल्ह्यात नियोजन करण्यात आले आहे.

पशुसंवर्धन विभागामार्फत बकरी ईद सण आनंदाने साजरा करण्यासाठी नियोजन करण्यात आले आहे. जिल्हा परिषदेच्या पशुसंवर्धन विभागामार्फत कुर्बानीसाठी आलेल्या म्हैस वर्गाचे कत्तली पूर्व तपासणीसाठी ठाणे जिल्ह्यातील सर्व पशुधन विकास अधिकारी तसेच सिंधुदुर्ग, रायगड व पालघर जिल्ह्यातील पशुधन विकास अधिकारी यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

बकरी ईद १७ जून ते १९ जूनपर्यंत साजरा करण्यात येत असून या सणानिमित्त मुस्लिम बांधव मोठ्या म्हैस वर्गीय पशुधनाची खरेदी करतात. या पशुधनाची नोंद भारत पशुधन प्रणालीवर ईयर टॅगिंग करण्यासाठी ठाणे जिल्ह्यातील पशुधन विकास अधिकारी व पशुधन पर्यवेक्षक यांची नियुक्ती तीन दिवसांसाठी करण्यात आली आहे.

परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी छायादेवी शिसोदे, जिल्हा अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. रुपाली सातपुते, जिल्हा पशुसंवर्धन उपायुक्त ठाणे डॉ. वल्लभ जोशी, जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी ठाणे डॉ. समीर तोडणकर, सहाय्यक आयुक्त बदलापूर डॉ. लक्ष्मण पवार, सहाय्यक आयुक्त जि.प.स.चि.शेलार डॉ. अजित हिरवे, सहाय्यक आयुक्त ता.ल.प.स.चि कल्याण डॉ. दीपक कंधारे यांच्या मार्गदर्शनाखाली ठाणे जिल्हा पशुसंवर्धन विभाग सज्ज झाला आहे.

# भगवंत सेवा संस्थेतर्फे विद्यार्थ्यांचा गुणगौरव



नालासोपारा : भगवंत सेवा संस्था या संस्थेतर्फे विद्यार्थ्यांसाठी गुणगौरव सोहळा वसई भगवंत सेवा संस्थेने यंदाही इयत्ता दहावी व बारावी उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांसाठी गुणगौरव सोहळा नुकताच आयोजित करण्यात आला होता. यावेळी भगवंत सेवा संस्थेने साई छाया हायस्कूल, जिजाऊ नगर, मोरेगाव, नालासोपारा पूर्वेतील १० वी उत्तीर्ण विद्यार्थी आणि कांचन हायस्कूल, नालासोपारा पूर्वचे १२ वी उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांचे गुणगौरव कार्यक्रम दि.०९/०६/२०२४ रोजी संपन्न झाला आहे. सदर कार्यक्रमाकरिता भगवंत सेवा संस्थेच्या संस्थापिका क्काबाई हनुमंत डोईफोडे तसेच भगवंत नर्सिंग स्कूल, मोरेगाव, नालासोपारा (पू.) या नर्सिंग कॉलेजच्या प्राध्यापिका प्रमिला नामदेव खैरे व संस्थेचे इतर पदाधिकारी देखील उपस्थित होते. तरी यांच्या मार्गदर्शनाखाली सदर कार्यक्रम पार पडला.

# आई–बाबा सामाजिक संस्थेतर्फे विद्यार्थ्यांना वह्यांची भेट

**जयेंद्र कोळी व माजी नगरसेविका नम्रता कोळी यांचा उपक्रम**

ठाणे : आई-बाबा सामाजिक संस्थेच्या वतीने ठाण्यातील प्रभाग क्रमांक २२ मधील एक हजारांहून अधिक विद्यार्थ्यांना वह्यांची भेट मिळाली आहे. ज्युनियर केजी ते पदवीपर्यंतचे शिक्षण घेणाऱ्या गरजू विद्यार्थ्यांना शाळा सुरू होण्याच्या अगोदर वह्या मिळाल्याने त्यांच्या चेहऱ्यावर एकच आनंद पाहायला मिळाला. संस्थेचे अध्यक्ष जयेंद्र कोळी व माजी नगरसेविका नम्रता कोळी यांच्याकडून १८ वर्षांपासून हा उपक्रम सुरू आहे.







महागिरी कोळीवाडा येथील एकविरा मित्र मंडळाच्या सभागृहात आमदार संजय केळकर यांच्या हस्ते वह्या वाटप तसेच १० वी व १२ वी मध्ये विशेष प्राविण्यने उत्तीर्ण झालेल्या यशस्वी विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला या कार्यक्रमाला भाजपाचे ठाणे शहर अध्यक्ष संजय वाघुले, महिला अध्यक्षा स्नेहा पाटील, आई बाबा सामजिक संस्थेचे अध्यक्ष,भाजपाचे चिटणीस जयेंद्र कोळी, माजी नगरसेविका नम्रता कोळी, माजी नगसेवक सुनिल हांडोरे, ठाणे जिल्हा हौसिंग फेडरेशनचे अध्यक्ष सिताराम राणे,भाजपा महिला मोर्चा नौपाडा मंडळ अध्यक्षा वृषाली वाघुले–भोसले, महिला मोर्चा सरचिटणीस रितू सेखोन,नौपाडा मंडळ सरचिटणीस रक्षा यादव, भाजपा ठाणे शहर जिल्हा सदस्या मीनाक्षी मिस्त्री, भाजपा गुजराती सेल सचिव दिलीप शाह, ओबीसी उपाध्यक्ष नरेश ठाकूर, अन्वेष जयगडकर, भाजपा शक्तिकेंद प्रमुख नितेश तेली, प्रभाग अध्यक्ष प्रतीक सोलंकी, शुभम गुप्ता, ठणेशहर जिल्हा कमिटी सदस्य रश्मी मोरे, अल्पसंख्याक महिला मोर्चा अध्यक्ष नीखत सारंग, मंडळ चिटणीस अंजली भालेराव, विजेंद्र चटोले, मंडळ उपाध्यक्ष सुनीता भोईर, शीला कोळी, अनुसूचित जाती महिला उपाध्यक्षा अरुणा कांबळे, कविता जाधव, सुनंदा भोईर, दिनेश कोळी, मयूर भालेराव, पंकज जैन, गोकुळ कुंड, कृष्णा देवळेकर, एकवीरा मंडळाचे पदाधिकारी सुरेंद्र भोई, हेमंत भोईर, संघर्ष महिला बचत गट, रमाई महिला मंडळ, रमाबाई महिला मंडळ आदींसह मान्यवरांची उपस्थिती होती.

‘महाराष्ट्र सम्राट’ हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक चंद्रकांत शंकरराव भोईटे यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अँड पब्लिकेशन्स प्रायव्हेट लिमिटेड, प्लॉट नंबर – डब्लू २३० टी.टी.सी. इंडस्ट्रियल एरिया, कोपर खैरणे, एम.आय.डी.सी., ठाणे बेलापूर रोड, नवी मुंबई – ४००७१० येथे छापून ३०२, हार्मोनी टॉवर, भारत ज्वेलर्स समोर, नेताजी सुभाष चंद्र रोड, कोर्ट नाका, ठाणे पश्चिम – ४००६०१ (महाराष्ट्र ) येथे प्रकाशित केले. संपादक – चंद्रकांत शंकरराव भोईटे ■ RNI - MAHMAR/2012/44140 ■ मो. नं. : +९१-९१६७९५७७७१